कनेटिकट काठी
नांदते मराठी

गजरा

दिवाळी २०२५

विविध गंधी ,विविध रंगी ,एका धाग्यात गुंफली ,ही शब्दांची फुले ...

अनुक्रम

अनुक्रम.. 1

अध्यक्षीय..3

संपादकीय.. 6

CTMM कार्यकारी मंडळ 2025-26..7

२०२५ आढावा.. 8

CTMM मराठी शाळा वृत्तांत..13

नादब्रह्म ढोल ताशा पथक आढावा..15

रंगरेषा.. 18

काव्यगंध..22

- व्यथा..22
- अनामिकेस..23
- नाव..25
- माझ्या पिल्लांसाठी..25
- पुन्हा हो तू स्वच्छंद..26
- नारी..29
- || पैलतीर||.. 29

ललित.. 30

- चराति चरतो भगः..30
- सिल्वर लायनिंग..32
- The Peacock and the Crane.. 35
- बॉस्टन.. 36
- A Letter to My Running Shoes Before Trip..38
- स्मार्ट टॉयलेट.. 39
- मराठी शब्दकोडे..41
- आयुष्यातील मूल्ये आणि समाधान.. 42
- A Day to Remember.. 45
- टिप्पेश्वर आणि ताडोबा भटकंती - वाघ अनुभवणं.. 47

धन्यवाद!.. 57

मुखपृष्ठ आणि कलारचना - शिल्पा गोसावी

अध्यक्षीय

नमस्कार मंडळी,
मी सौ. ज्योत्स्ना कुरकुटे, कनेटिकट महाराष्ट्र मंडळाची अध्यक्षा, आपल्याशी संवाद साधताना मनापासून आनंद वाटतो. सर्वप्रथम, दिवाळी आणि येणाऱ्या नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

गेल्या नऊ वर्षांपासून मी कनेटिकटमध्ये स्थायिक असून, क्लिनिकल रिसर्च क्षेत्रात कार्यरत आहे. कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळताना स्वतःचे छंद जोपासण्याचा मी नेहमीच प्रयत्न केला. या प्रवासात मी मंडळाशी जोडली गेले आणि मागील दोन वर्षे कार्यकारिणी सदस्य म्हणून अनुभव घेतला. यंदा अध्यक्षपदाची जबाबदारी मिळाल्यावर सुरुवातीला थोडं दडपण वाटलं, पण मंडळाच्या कुटुंबात मिसळताना ती भीती ओसरली आणि आपलेपणाची भावना आली. नोकरी, छंद आणि कुटुंबातील विविध भूमिका सांभाळताना नेतृत्वाची आणि स्वतंत्र व्यक्तिमत्वाची जाणीव अधिक गडद झाली आहे.

मंडळाचं मुख्य ध्येय म्हणजे मराठी संस्कृतीचा वारसा जपणे आणि तो पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे. 'कनेटिकट काठी नांदते मराठी' या घोषवाक्याला प्रेरणा मानून आम्ही दहा कार्यकारिणी सदस्य एकजुटीने आणि उत्साहाने काम करत आहोत, आणि आज मंडळात 230 हून अधिक मराठी कुटुंबे सभासद म्हणून सहभागी आहेत. हे कुटुंब वाढताना पाहणं आणि प्रत्येक कार्यक्रमात नव्या चेहऱ्यांची ओळख होणं, हा आमच्यासाठी विशेष आनंदाचा क्षण असतो.

२०२५ हे वर्ष संस्मरणीय व्हावं यासाठी आम्ही वर्षाच्या सुरुवातीलाच सगळ्या कार्यक्रमांचे सविस्तर नियोजन केले. संक्रांत, गुढीपाडवा, "जीना इसी का नाम है", ५K धावणे/चालणे, क्रिकेट स्पर्धा, धरोहर – वारसा स्वरांचा, आशिष पाटील यांच्यासोबत लावणी कार्यशाळा, गणेश उत्सव, मर्डरवाले कुलकर्णी आणि दिवाळी मैफिल असे दहा विविध कार्यक्रम न थकता साजरे केले. सभासदांसाठी डिजिटल काव्यस्पर्धा आणि "मनाचे श्लोक" स्पर्धा आयोजित केली, ज्यात सहभागाचा उत्साह विशेष जाणवला.

यावर्षीचे खास वैशिष्ट्य म्हणजे 'नादब्रह्म ढोल ताशा' आणि 'युवा नादब्रह्म' पथकातील सदस्यांचा वाढता सहभाग; अथक परिश्रमाने या पथकाने आपल्या मंडळाला वेगळाच रंग आणि ऊर्जा दिली. ४० पेक्षा अधिक सभासदांचा सहभाग असलेले हे पथक आपला झेंडा सर्वत्र अभिमानाने फडकवत आहे.

आम्ही आपल्या मंडळाच्या वेबसाइटची सुरक्षा अधिक मजबूत केली असून, Tugoz वापरायला सुरुवात केल्यामुळे सभासद व्यवस्थापन आणि कार्यक्रमाच्या तिकिटांची नोंदणी अधिक सोपी आणि सुव्यवस्थित झाली आहे.. गेल्या काही वर्षांपासून आपल्या मंडळाचा नॉन-प्रॉफिट दर्जा रद्द झाला होता. तो पुन्हा मिळवण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत आहोत, आणि सध्या ही प्रक्रिया शेवटच्या टप्प्यात आहे.

मराठी शाळेत शिक्षकांची निःस्वार्थ सेवा आणि मुलांचा वाढता सहभाग पाहून मनात समाधान वाटते; सध्या आपल्या शाळेत १०० हून अधिक मुले शिकत आहेत, आणि या वाढत्या आवडीमुळे आम्ही Farmington Valley मध्ये मराठी शाळेची नवी शाखा सुरू केली आहे.

अध्यक्षा म्हणून माझ्यावर असलेल्या जबाबदाऱ्या आणि आव्हाने जसे की कार्यक्रमांचे नियोजन, त्यात नाविन्य आणणे, वेळेचे पालन, मंडळाचा चेहरा म्हणून विविध परिस्थितींना समर्थपणे सामोरे जाणे, लहान मुलांपासून ज्येष्ठ सभासदांपर्यंत सर्वांना सहभागी करून घेणे, विविध स्तरांवर संवाद साधणे, कोणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाहीत याची काळजी घेणे आणि सर्वांना एकत्रितपणे पुढे नेणे, या बहुतेक जबाबदाऱ्या मी यशस्वीपणे पार पाडू शकल्याचा मला विशेष आनंद आणि समाधान आहे. मी किंवा माझ्या कार्यकारिणीकडून जाणून-अजाणून काही चुका झाल्या असतील किंवा काही गोष्टी राहून गेल्या असतील, तर कृपया त्या गोड मानून घ्याव्यात आणि आम्हाला पूर्वीप्रमाणेच, किंबहुना अधिक, आपली साथ व प्रोत्साहन द्यावे, ही नम्र विनंती.

या वर्षातील प्रवासात सभासदांची, कार्यकारिणीची आणि कुटुंबाची साथ मला मिळत गेली. प्रत्येक कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अनेकांचे प्रयत्न आणि सहकार्य आवश्यक असते, आणि मंडळाचे काम हे सर्वांच्या एकत्रित योगदानामुळेच पुढे जात आहे. मंडळाच्या पुढील वाटचालीसाठी प्रत्येकाने योगदान द्यावं, ही माझी मनापासून विनंती आहे. स्वयंसेवक म्हणून, देणगीदार म्हणून किंवा कार्यक्रमात सहभागी होऊन आपण मंडळाचा वारसा समृद्ध करू शकता. विशेषतः युवा पिढीने पुढे यावं आणि मराठी संस्कृतीची धुरा आपल्या खांद्यावर घ्यावी, असं मला वाटतं.

आपलं मंडळ जरी छोटे असलं, तरी त्यात लहान मुलांना संस्कृतीचे ज्ञान देणे, प्रत्येकामधील कला आणि सर्जनशीलता बाहेर आणणे, आणि सर्वांनी मिळून ती अटकेपार नेणे हा आपला सामूहिक प्रयत्न असावा. २०२६ मध्ये नवीन उपक्रमांसाठी मनःपूर्वक स्वागत आहे. अजूनही अनेक कलागुणी सभासद मंडळात सहभागी झालेले नाहीत; त्यांनी खाद्यपदार्थ, कपडे, कलात्मक वस्तू आणि संस्कारवर्धक उपक्रमांत सक्रिय सहभाग घ्यावा, कारण यात तुमचाही आणि मंडळाचाही लाभ आहे.

मंडळ कार्यकारिणी, स्वयंसेवक आणि समर्थक यांच्या सहकार्याबद्दल व सेवेबद्दल मी मनःपूर्वक आभार मानते. तुमचं योगदान अमूल्य आहे.
वर्ष सरलं, अनेक गोष्टी साध्य केल्या, काही गोष्टी अजूनही पूर्ण करायच्या आहेत. तुम्हाला काही नवीन कल्पना सुचल्या किंवा काही अपेक्षा असतील, तर कृपया आम्हाला जरूर कळवा.

चला तर मग, भेटूयात पुढच्या वर्षीच्या पहिल्या संक्रांत कार्यक्रमात! त्याच जोशात, त्याच एकतेने!

आपली विनम्र अध्यक्षा,
ज्योत्स्ना कुरकुटे

संपादकीय

साहित्य किंवा कुठलीही कलाकृती ही समाजमनाचा आरसा असते. ती त्या विशिष्ट काळातील संस्कृती, जीवनशैली आणि भावविश्व यांचा संक्षिप्त आलेखही देते. गजरा दिवाळी अंकाचे संपादन करताना जुन्या छापील आवृत्त्या चाळण्याचा योग आला आणि मन भूतकाळात रमून गेले. त्या अंकांमध्ये केवळ उत्तम साहित्यच नव्हते, तर कनेटिकटमधील मराठी समाजाची गतकाळातील जीवनदृष्टीही होती.

मंडळाच्या स्थापनेनंतर अवघ्या दोन वर्षांत गजरा या न्यूजलेटरचा जन्म झाला. हे गजऱ्याचे १७वे वर्ष. दरवर्षी त्याचा दर्जा आणि विस्तार वाढत गेला—प्रवासवर्णने, स्वानुभव, मुलाखती, बालसाहित्य, कविता आणि विविध विषयांवरील लेखांनी तो समृद्ध होत गेला. मात्र काळाच्या ओघात आणि कोव्हिडच्या फटक्यामुळे गजरा काही काळ थांबला.

दरम्यान, तंत्रज्ञानाने झेप घेतली. मराठी लेखन सुलभ झाले आणि संपादनाची प्रक्रिया अधिक सुटसुटीत झाली. CTMM ने २०२३ मध्ये गजरा पुन्हा नव्या डिजिटल रूपात सादर केला—हा केवळ पुनर्जन्म नव्हता, तर परंपरेचे पुनरुत्थान होते. गजऱ्याचा प्रवास म्हणजे कनेटिकटमधील मराठी समुदायाचा सांस्कृतिक प्रवास. हे माध्यम नव्यांना जुन्याशी जोडते, आठवणींना उजाळा देते आणि नव्या पिढीला प्रेरणा देते.

गजरा २०२५ हा अंक याच परंपरेचा पुढचा टप्पा आहे. या अंकात CTMM तर्फे आयोजित विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आणि उपक्रमांचे क्षणचित्रण आहे, वैविध्यपूर्ण विषयांवरील लेख आहेत, तसेच सृजनशील कवितांचा समृद्ध भांडारही आहे. आपल्या कनेटिकटमधील युवा पिढीचे कलागुण या अंकातून प्रभावीपणे व्यक्त होतात. हा अंक तुम्हाला आवडेल आणि या प्रवाहात समाविष्ट होण्यासाठी प्रेरित करेल, अशी आशा आहे. काही चूक-भूल झाली असल्यास क्षमा करावी.

गजरा २०२५ अंकाचे संपादन करणे हा माझा बहुमान आहे. ही संधी साधून मी गतवर्षीच्या सर्व संपादकीय टीमसचे उज्वल परंपरा सुरू ठेवल्याबद्दल मनःपूर्वक आभार मानतो. तसेच, या अंकासाठी योगदान देणाऱ्या सर्व लेखकांचे, कलाकारांचे आणि मदतनीसांचे मनःपूर्वक आभार. कार्यकारी समितीच्या सदस्यांचे विशेष आभार, ज्यांच्या सहकार्यामुळे हा अंक साकार झाला.

सुशांत गोसावी

संपादक – गजरा २०२५

CTMM कार्यकारी मंडळ 2025-26

जोत्सना कुरकुटे
अध्यक्षा

वैदेही परांजपे
उपाध्यक्षा

मुकुंद आवटी
खजिनदार


विशाल कुर्हेकर
सचिव

हर्षदा दप्तरदार
कार्यकारिणी सदस्य

सुशांत गोसावी
कार्यकारिणी सदस्य

अनुप्रिया कायंदे
कार्यकारिणी सदस्य

योगी भोसरेकर
कार्यकारिणी सदस्य

विनय पडोळे
कार्यकारिणी सदस्य


अल्पना नाईक
कार्यकारिणी सदस्य

२०२५ आढावा

CTMM मकरसंक्रांत

CTMM 2025 चा वर्षाचा पहिला कार्यक्रम "संक्रांत". नव्यानेच रुजू झालेल्या या कार्यकारी मंडळाने अतिशय हिरिरीने कार्यक्रमाची धुरा सांभाळली. सुरुवात झाली ती हळदीकुंकू आणि बोरन्हाण ने. अंताक्षरीने एक वेगळीच रंगत आणली. फॅशन शो ने तर सगळा माहोलच बदलून गेला, त्यात लहान आणि मोठे सगळे सहभागी झाले. उत्तम अशा खाद्यपदार्थांच्या स्टॉलने तर अजूनच रंगत आणली. मेंबर्सना 'वाण' देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

CTMM डिजिटल स्पर्धा

कनेटिकट महाराष्ट्र मंडळाने (CTMM) यंदा प्रथमच सभासदांच्या काव्य प्रतिभेला वाव देण्यासाठी डिजिटल कविता स्पर्धा आयोजित केली. स्पर्धकांनी विविध विषयांवर सर्जनशील कविता सादर करून मराठी काव्यरसिकांची मने जिंकली. सर्व कविता CTMM च्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आल्या असून रसिकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. बालवर्गासाठी “मनाचे श्लोक” स्पर्धा आयोजित करण्यात आली होती, ज्यात मुलांनी समर्थ रामदास स्वामींचे श्लोक अर्थासह सुमधुर रीतीने सादर केले. दोन्ही स्पर्धांचे परीक्षण साहित्य, कविता आणि संस्कृती क्षेत्रातील मान्यवरांनी केले.

या उपक्रमाद्वारे CTMM ने मराठी भाषा, कविता आणि संस्कृतीप्रेमींसाठी एक व्यासपीठ निर्माण करत पुढील पिढीला संस्कृतीशी जोडून ठेवण्याचा सुंदर प्रयत्न केला आहे.

CTMM गुढी पाडवा

CTMM तर्फे यंदाचा गुढीपाडव्याचा कार्यक्रम जत्रेच्या स्वरूपात मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात अनेक *पहिल्यांदाच* सादर झालेली आकर्षणे होती — प्रथमच आयोजित केलेली *कनेटिकट खो-खो लीग स्पर्धा*, मजेशीर *१ मिनिट गेम्स*, *CTMM मास्टर शेफ स्पर्धा*, आणि सगळ्या वहिन्यांसाठी खास *पैठणीचा खेळ*. कार्यक्रमाची सांगता रंगतदार *लावणी महोत्सवाने* झाली. या प्रसंगी सौ. विद्याताई सप्रे यांनी *"समाजरंग"* या उपक्रमाची माहिती दिली, तसेच मंडळातर्फे त्यांचा मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

जीना इसी का नाम हैं

दीपस्तंभ फाउंडेशनचे संस्थापक, *मनोबल प्रोजेक्ट*चे प्रणेते आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेते समाजसेवक श्री. यजुर्वेंद्र महाजन यांचे *"जीना इसी का नाम है"* या कार्यक्रमांतर्गत व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांच्या जडणघडणीपासून विविध उपक्रमांपर्यंतचा प्रवास, त्या उपक्रमांतील आव्हाने आणि नागरिकांच्या सहभागाचे महत्त्व याबाबत त्यांनी प्रेरणादायी माहिती दिली. त्यांचे विचार केवळ स्फूर्तीदायक नव्हते, तर आपल्या जीवनातील ध्येयधोरणांवर आत्मचिंतन करण्यास प्रवृत्त करणारे होते. मंडळातर्फे त्यांच्या उपक्रमांना २५० डॉलर्सची छोटीशी देणगी देण्यात आली.

CTMM Spring 5k Walk & Run

Connecticut Maharashtra Mandal (CTMM) तर्फे आयोजित *CTMM 5K Run* रविवार, ११ मे २०२५ रोजी रमणीय Farmington Trail वर उत्साहात पार पडली. पावसाच्या शक्यतेनंतरही उजाडलेला सूर्यप्रकाश आणि आल्हाददायक वारा धावण्यासाठी उत्तम ठरला. १०० हून अधिक सहभागी — लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत — जोमाने सहभागी झाले. सुरुवातीला गटवार व्यायामाने सगळ्यांचा उत्साह वाढवला. धावण्याच्या मार्गावर पाणी आणि केळीची सोय करून सहभागींना ऊर्जा मिळाली, तर वेळेत धाव पूर्ण करणाऱ्यांना आकर्षक ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. स्थानिक Life Insurance Agent यांच्या प्रायोजकत्वाखाली पार पडलेल्या या उपक्रमाने आनंद, एकता आणि आरोग्याचा संदेश देत वसंत ऋतू संस्मरणीय केला.

धरोहर - वारसा स्वरांचा

दि. २१ जून २०२५ रोजी कनेटिकट महाराष्ट्र मंडळाने आयोजित केलेल्या *"धरोहर – वारसा स्वरांचा"* या डॉ. सलील कुलकर्णी (लोकप्रिय संगीतकार, गायक आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेते चित्रपट दिग्दर्शक) आणि त्यांचे पुत्र शुभंकर कुलकर्णी यांच्या सांगीतिक मैफिलीत रसिक प्रेक्षक अक्षरशः स्वरझंकारात न्हाऊन निघाले.

संगीत, शब्द आणि रसिकांचा वारसा या संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या संगीताच्या समृद्ध परंपरेचा उत्सव होता. कार्यक्रमात अभंग, बालगीते, लावण्या, रागमाला, मराठी आणि हिंदी गीतांसह नव्या पिढीला भावणारी इंग्रजी गीतेही सादर करण्यात आली, ज्यांना विशेषतः युवागटाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

CTMM Cricket Premier League

सलग तिसऱ्या वर्षी, "CTMM क्रिकेट प्रीमियर लीग" हि बॉक्स क्रिकेट स्पर्धा ९ ऑगस्ट ला क्रॉमवेल येथील पियर्सन पार्कमध्ये आयोजित करण्यात आली होती. ह्यावर्षीचे वैशिष्ठ्य म्हणजे १९-५० वर्षे वयोगटासोबत बाल गट (२ संघ) आणि प्रौढ गट (३ संघ) अशा २ नवीन गटांमध्ये सुद्धा स्पर्धक संघ होते. एकंदरीतच, १५ संघांचा समावेश असलेली हि स्पर्धा अतिशय चुरशीच्या सामान्यांनी, आणि धमाल DJ म्युझिक व मार्मिक कॉमेंटरी मुळे, चांगलीच रंगली. स्पर्धेतील विजेत्यांची वैयक्तिक आणि सांघिक बक्षिसे १३ सप्टेंबर च्या CTMM गणेशोत्सव कार्यक्रमामध्ये देण्यात आली.

CTMM गणेशोत्सव

या वर्षीच्या CTMM गणेशोत्सवाने रंगत आणली — बालगोपाळांचे ढोल-ताशा आणि लेझीम पथक, ७० हून अधिक मुलांनी साकारलेली *कृष्णलीला*, नवविवाहित जोडपी आणि मुलांनी केलेली स्थापना, सुगरणींचे पारंपरिक जेवण व बासुंदी, आणि मनमोहक मराठी नाट्यरंग — या सर्वांनी कार्यक्रमाला बहार आणली.

CTMM मर्डर वाले कुलकर्णी

हे नाटक सादर करण्याचा निर्णय घेतला तेव्हा प्रतिसाद कसा मिळेल याची थोडी धाकधूक होती. प्रयोगाच्या दिवसा पर्यंत अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. पण जेव्हापासून नाटकाचा पडदा उघडला आणि कलाकारांची धमाल सुरू झाली, तेव्हाच सगळ्या शंका-धाकधुकीचा विसर पडला. प्रत्येक कलाकाराची अभिनयशैली, संवाद, विनोदाचे टायमिंग आणि दिग्दर्शन — सगळं काही अप्रतिम होतं! रसिक प्रेक्षकांनी मनापासून दाद दिली आणि नाटकाचा आस्वाद घेतला. त्यात भर पडली ती झणझणीत मिसळ, खुसखुशीत सामोसे आणि वाफाळत्या चहाच्या!

मराठी रसिकांना यापेक्षा अजून काय हवं असतं!

आणि *कनेक्टिकट मराठी मंडळ* त्यासाठी नेहमीच तत्पर असतं.

CTMM मराठी शाळा वृत्तांत

लहानपणी जेव्हा मराठी लिहायला शिकले, तेव्हा खूप मजा वाटली. एक वेगळीच लिपी, इंग्रजीपेक्षा एकदम वेगळी अक्षरे. नवीन भाषा शिकणं अवघड आहे, पण एकदा त्या भाषेत संवाद करता यायला लागला की, एक वेगळाच आनंद मिळतो. इथे शिकणाऱ्या आणि राहणाऱ्या आपल्या भारतीय मुलांना सुद्धा हाच आनंद मराठी शिकताना व्हावा ह्या दृष्टिकोनाने मराठी शाळेत आम्ही वेगवेगळे उपक्रम चालवतो.

आपण सगळे भारतीय भारत सोडून इकडे राहतो, पण आपल्या मुलांना आपली भाषा, आपली संस्कृती ह्यांची ओळख राहावी; मुलांनी भारतातल्या नातेवाइकांबरोबर मराठीत संवाद करावा ही इच्छा असते. मराठी शाळेत येणारी ही मुले फक्त मराठी भाषा बोलायला, वाचायला आणि लिहायला शिकत नाहीत, तर ते मराठी भाषेवर प्रेम करायला देखील शिकतात. आम्ही शाळेत नुसता अभ्यास करत नाही, तर सगळे सण देखील साजरे करतो. दिवाळी, गुढी पाडवा, गणपती इत्यादी सणांची माहिती देऊन मुलांकडून ह्या सणांना काहीतरी उपक्रम सुद्धा करून घेतो.

मराठी लँगवेज क्लास न म्हणता, ह्याला **मराठी शाळा** म्हणतो :).

मराठी शाळेत सध्या ५ इयत्ता आहेत. मुले **बृहन्महाराष्ट्र मंडळ (BMM)** चा अभ्यासक्रम शिकतात. त्यांना BMM ची पुस्तके दिली जातात आणि वर्षा अखेरीस ते BMM ची परीक्षा देखील देतात. इथे शिकवणारे शिक्षक मराठी भाषेच्या प्रेमापोटी, बाकी कशाचीही अपेक्षा न ठेवता, दर शुक्रवारी मुलांना शिकवायला येतात. ही शाळा माझं एक छोटसं कुटुंबच झालंय आणि आम्ही सगळे शुक्रवारी संध्याकाळी खूप धमाल करतो.

मराठी शाळेत येणाऱ्या मुलांची संख्या दर वर्षी वाढतच आहे, आणि सांगायला अतिशय आनंद होतोय कि ह्या वर्षी आम्ही **Farmington Valley** ची एक नवीन शाखा सुरु केली आहे. आता आमच्या Connecticut मध्ये ३ शाखा आहेत – **South Windsor, Danbury आणि Farmington Valley**.

शाळेबद्दल काहीही माहिती हवी असल्यास माझ्याशी नक्की संपर्क साधा किंवा शुक्रवारी आमच्या शाळेला भेट द्या :).

शाळा संचालकांची आणि शाळा शिक्षकांची टीम अजून मोठी होत आहे, आणि ह्यातला प्रत्येक सदस्य तेवढाच महत्वाचा आहे.

आमच्या ह्या टीमच्या सगळ्या सदस्यांचे मनःपूर्वक आभार – **गौरी कुर्हेकर, मयुरा पाटील, अरुणा ठाकर आणि अपर्णा पडवळ**

शाळा समन्वयक,

नुपूर कुलकर्णी

नादब्रह्म ढोल ताशा पथक आढावा

The dhol–tasha is one of Maharashtra's most iconic and powerful cultural expressions. Once performed mostly in Maharashtra, it has now found a home across India and even internationally. At CTMM, our NadBhramha Pathak carries that tradition forward with pride, discipline, and passion. Every performance is not just about rhythm and energy, but about honoring our heritage and sharing the joy of our culture with the wider community.

When we started this season, we had a strong foundation of committed players, but also a clear vision — to improve the quality of our performances, to welcome and train new members, and to build a pathak that truly represents the full traditional experience. The difference between our first performance of the year and the last one of the season is truly remarkable. What began with 11–12 active players has now grown into a team of nearly 30–40 performers. We expanded practices across 4–5 locations in Connecticut so more players could participate, and we added regular jhanj, zenda, and lezim performers so that our pathak feels complete and authentic, just like the ones we grew up watching back home.

None of this would have been possible without a few key people who gave their time, skills, and heart into building this pathak. A special thank you to Medha Kelkar for leading alongside me, and to Prathamesh Sawarkar, Yamini Bobde, Jignesh Fumakiya, and Vishal Joshi for conducting practices, teaching rhythms, maintaining discipline, and constantly pushing for better quality. Their dedication has shaped every beat of this journey.

Another big milestone this year was something that is very close to my heart — involving children in the pathak. Many of us love dhol–tasha because we grew up with it. We have childhood memories of watching processions, feeling that vibration in our hearts, and dreaming of being part of a pathak someday. We wanted our children to experience the same pride and joy. That is how NadBhramha Yuva Pathak was born — with dhol, tasha, jhanj, lezim, and zenda, and more than 30 enthusiastic kids learning and performing. Some of them even had the opportunity to perform outside Connecticut, which was a proud moment for all of us. Again, this was only possible because of the same coaches and volunteers who guided the adult pathak.

By the end of the season, our regular pathak had over 35 active performers and we participated in 11 events across Connecticut, New Jersey, New York, and Massachusetts. Each performance was a learning experience, a moment of pride, and a reminder of how far we have come in a short time.

And yet, this is just the beginning. We have a big year ahead, with bigger goals, more learning, and more opportunities to represent our culture. None of this can happen without continued practice, dedication, support from families, and the strong team spirit that keeps us together.

From the bottom of my heart, thank you to every single member who showed up, learned, practiced, performed, lifted instruments, drove long distances, encouraged others, and helped build this pathak one beat at a time.

And a heartfelt thank you to all our regular pathak members —
Medha Kelkar, Prathamesh Sawarkar, Aaradhya Sawarkar, Preeti Gundapwar, Chetan Hire, Harshad Shinde, Jignesh Fumakiya, Aruna Thakar, Ahana Patwardhan, Prashant Ardalkar, Prajakta Ardalka,Sandeep Avachat, Yamini Bobde, Sameer Chimote, Radhika Chimote, Mahadu Kurkute, Varsha Deshmukh, Sushant Gosavi, Shilpa Gosavi, Viniket Harchange, Rahul Patil, Niharika Jog, Vishal Joshi, Minal Avachat, Kedar Kulkarni, Jotsna Kurkute, Sushil Makhijani, Rupali Malpure,

Radhika Marathe, Supriya Patwardhan, Parag Patwardhan, Vikrant Tonpe, Umakant Patel, Kalpana Shelar, Santosh Shelar, Santosh Kayande, Anupriya Kayande, Akshara Sujit Gokhale, Avni Avachat, Nabhaa Kelkar, Ahana Fumakiya, Avni Patil, Akshara Avachat, Swara Kayande, Iha Kulkarni, Parth Gokhale, and Eshaan Gokhale.

A pathak is not made of drums and sticks. It is made of people — their passion, energy, discipline, and love for the culture. Thank you for being that strength. The rhythm continues, and the journey ahead is even more exciting.

Yogi Bhosrekar
CTMM Nadbrahma Pathak Pramukh

रंगरेषा



सोहम बिराजदार



स्वरा अर्दाळकर

शिल्पा गोसावी



अमेय पुराणिक

MYSTIQUE
©AMEY PURANIK

Amey Puranik

काव्यगंध



व्यथा

जेव्हा आला VISA वाटले जिंकले सगळं जग,
पण भरतांना बॅग झाली मनाची तग—
मग, काय न्याव काय नाही हे काही कळतच नव्हते,
एयरपोर्ट चे रिस्ट्रिक्शन पण आईची यादी काही संपतच नव्हते.

"असल पाहिजे का तुला तसल तिथे काही मिळणार नाही,"
"अग आई हे न्यायला तर चालणार नाही, हो का! घेऊन तर जा, गेल तर गेल"
तिचे हे भोळे भाबडे बोल,
२३ Kg ची दोन बॅग्स आहे आता तरी तौल,

किती अवघड असते ना इतक्या वर्षांची आठवणी इवुक्ल्या झोळीत साठवणार,
आईची माया, बाबांचा लळा, भावा बहिणीचा आधार,
घराची माती, अंगणातले फूल, लहानपणा पासूनच्या गोष्टी...
इतक्यात कसे सामावणार.

झाला आता प्रवास सुरू,
एकी कडे होता आनंद जग फिरायचा, दुसऱ्या कडे होता संकोच तो घर हरवायचा,

नवीन जागा, नवीन लोक, स्वच्छंद जीवन,
आपल्या अस्तित्वाचे आपणच सूत्रधार,

पेटीत ठेवलेली आजीच्या गोडदीतून तिचा दरवळणारा सुवास कसा विसरणार,
इथे आल्यावर जग सोपे नसते
Vedio कॉल वर दाखवतो हसू पण मनात रुख रुख असते,

मुलगा मुलगी समान आहे हे इथेच येऊन कळते,
आईचा लाडका असो किंवा बाबाची परी
इथे कामाशिवाय कोन्हालाही पर्याय नसते,

घरी पाणी सुद्धा हातात ना घेणारा डिशवाशर लावते,
ऑफिसचे प्रेजेंटेशनची तैयारी लाँडरी रूम मधेही करते,

डॉलर मध्ये कमावतो आम्ही, पालकांना असते त्याचा अभिमान,
रुपये मध्ये कन्व्हर्ट करायची आमची सवय कधी जाणार?

आमची पिढी अशी आहे ना...
आपल्या आई वडिलांच वय आणी मुलांचा भविष्यात सामंजस्य जमवणारी,
एक पाय विदेशात तर एक पाय भारतात ठेवणारी,
इथे येऊन परके लोक आपुलकीने आपले करून घेणारी,
कोणी भाऊ कोणी बहीण बनवून एकमेकांला प्रत्येक स्तिथित साथ देणारी,
बाहेर राहून सुद्धा आपल्या आणि मुलांच्या मनात "भारत" जिवंत ठेवणारी,
ख्रिसमस असो कि दिवाळी धुमाकूळ घालणारी,
वेस्टर्न असो किंवा इंडियन दोन्ही परिधानात इत्तरणारी,
आपण घरचे जबाबदार व्यक्ती आहे याच नेहमी भान ठेवणारी.

या सगळ्यानंतर ही...
सगळं मिळते ग आई इथे तुझ्या मायेची ऊब नाही,
पण आपल स्वपन पूर्ण होत आहे, हा आनंद तुझ्या चेहऱ्यावर बघण्यापेक्षा जास्त मोठ अजून काही सुख नाही.

— ***मेघना विनय शिंदे***

अनामिकेस

प्रस्तावना:

नमस्कार, मी सुधीर ओक. कविता सादर करण्यापूर्वी त्यामागची भूमिका थोडक्यात सांगतो. कविवृत्ती, सौन्दर्यदृष्टी, आणि निखळ रसिकतेतून रसग्रहण करण्याची क्षमता असलेल्या मनाला, सौंदर्याचा आविष्कार केंव्हावी, कुठेही, कसाही, आणि कितीही होऊ शकतो. म्हणूनच या कवितेचं शीर्षक आहे:

"अनामिकेस"!

तव पाहुनी छबीस, मम वाटले दिठीस
फिरे गालावरती जसे, हळुवार मोरपीस ॥
ना कधी मनी ना ध्यानी, ना कधी द्रुष्टी आलीस,
आभाळी अवचित उल्का, जाणिवेत तू भरलीस ॥
उजळावी देवघरातुन, जशी सांजवातीची ज्योत
प्रतिमा तव तशीच उजळे, माझ्याही अंतरात ॥
पूर्ण उमलल्या नेत्रांमधुनी, संयततेचे झरे चांदणे
रसिक-मने तर विसरुन जातिल, चुकुनही बघणे इकडे-तिकडे ॥
ओठांमधुनी असे उमटली, अलगद स्मितरेषा ही जरी
स्मितहास्यातील भाव-भावना समजेना मज मुळीच उरी ॥
आश्र्वासक की आवाहक म्हणु, मनी न मजला काही कळे
तुझ्या मनीच्या भावांचे हे, कोडे मज ना कधी सुटे ॥
गूढ तुझे हे सोडवताना, मनी अचानक मज वाटे
मोनालीसा हवी कशाला, अनामिका असता ही पुढे ॥

- **सुधीर ओक**

नाव

ही तरंगणारी नाव
थांबे आता किनाऱ्याशी
गाठता इच्छित ठिकाण
हितगुज करे वाऱ्याशी....

पाण्याच्या साथीने
प्रवास होई सुखाचा
पाण्याच्या शिडकाव्याने
थर वाहे दुःखाचा....

निवांत अशा नावेत
मन होई शांत
तेही तरंगे हलकेच
अन् उरे ना कसली भ्रांत....

सोडुनी किनाऱ्याशी
ही नाव घेई विसावा
रात्रीच्या काळोखात
मग चंद्रसडा दिसावा....

भेटे तो किनारा
अन् चंद्रही भेटे
चांदण्यात फिरण्याची
हौस ती फिटे....

मुक्त विहरणारी
ही नाव साथ देई
किनाऱ्याच्या सोबतीने
मग चंद्र दर्शन देई....

अंकिता कार्ले

माझ्या पिल्लांसाठी

मन हे सुंदर कोमल फुलापरी
किती तो भार विचारांचा त्यावरी
उधळून टाक दडपण त्यावरचे
जरी ती तुझी सत्वपरिक्षा ठरते

इवल्या इवल्या ईच्छांना स्वप्नांचा आकार दे
स्वइच्छेने आपुल्याच विचारांना स्वीकार दे
मनमौजी मतलबी म्हणुन टोचतील ही जन आणि मन
यशप्राप्तीवर तुझ्याच तुझेच कौतुक करतील हेच सर्व क्षण क्षण

निर्णय घेतांना स्वअस्तित्वाचा , घुसमट होईल कधीतरी
कर्तव्याची जाण ठेऊनी , पाउल टाक क्षितिजावरी
उंच स्वछंदी उडतांना , पाउल मात्र जमिनीवरी असु दे
तुझ्यातील माणुसकी जपण्याचा आग्रह तेवढा चिरंतर मनी राहु दे

धन द्रव्य मालमत्ता , हे नाही जपलस तरी प्रेम आणि माणसं जप
स्वत:ला जाणण्याचा मार्ग च आहेत साधना आणि तप
प्रेमाने आणि प्रेमासाठी जग सारे जिंकुन घे
तुझ्या प्रत्येक यशप्राप्तीवर शुभाशिर्वाद आप्तजणांचा असु दे

आयुष्यात कधीच कसलीच न रहावी खंत
घे भरारी प्रत्येक क्षणाला कमी पडेल तुला आसमंत
कुणाची का हवी साथ तुला तुच तुझा पाठीराखा हो
स्वप्नांची साथ असेल तर मन तर सदैवच जिंकेल न हो

मनुश्री
(सौ.मयूरा श्रीकांत पाटील)

पुन्हा हो तू स्वच्छंद

घेऊन डोळ्यांत असंख्य स्वप्न
गेलास तू पैलतीरी
अहोरात्र करून कष्ट
बाळगलेस एक ध्येय उरी

तुझं भोवती यशोकिर्ती
सारी सुखे लोळण घालती
मायेच्या त्या स्पर्शासाठी
तरी का मन ते दाटती?

नात्यांचे बंध निसटून जाती
मना मनाचे संवाद हरपती
भोगुनही माया सारी
मन कोणत्या मोहात अडकती?

आता नको फिरुस मागे
ओढती जरी मोहाचे धागे
काळजीचा भार दे सोडुनी
बघ क्षितिजा पल्याड
अंधुक शाश्वत येईल दिसूनी ..

उघडून तुझे ज्ञानचक्षू
पहा एकदा अंतरंग
सोडून हा सोन्याचा पिंजरा
पुन्हा हो तू स्वच्छंद

सौ. अनुप्रिया केंद्रे-कायंदे

नोटिफिकेशन्स

आज बऱ्याच दिवसांनी पुस्तक वाचायचं घेतलं मी मनावर,

२-४ पान वाचून होताच, मोबाईल चा मोह झाला अनावर..

****

ब्रेकिंग न्यूज च नोटिफिकेशन दिसताच, मी ते लगेच उघडलं,

कोण काय म्हणाले, हे वाचत बसल्याने माझं वेळेचं गणित बिघडलं..

यूट्यूब व्हिडिओ, इंस्टा च्या रील्स चा होत राहतो माझ्यावर भडीमार,

मीच मला केलं 'हात दाखवून अवलक्षण' आणि म्हटलं 'आ बैल मुझे मार'..

आउटलूक चे इमेल्स, व्हॉट्सअॅप चे चॅट वाचून झाल्यावर मी शोधू लागलो स्पॉटिफाय वर गाणी,

घड्याळाकडे लक्ष जाताच मात्र, माझ्या तोंडचं पळालं पाणी..

****

वाढदिवसाच्या शुभेच्छा द्यायला फेसबुक ने मला आमंत्रण देऊन बोलावले,

आलाच आहेस तर २-४ पोस्ट वाचून जा असे सुनावले..

नावात जरी असले बुक तरी पुस्तकांशी नाही याचं काही देणंघेणं,

सोशल मीडिया म्हणजे आता झालंय अवघड जागेचं दुखणं..

****

टीम्स वर बॉस चं पिंग बघून मी केला रिप्लाय हाय,

त्याने केला लगेच कॉल आणि विचारले प्रोजेक्ट च स्टेटस काय?

जे काम पुढच्या आठवड्यात देखील करता आले असते त्यासाठी घालवला मी वीकेंड चा वेळ,

४०-७० की ९० तास या वादविवादात, वर्क लाईफ बॅलन्स चा कसा घालावा मेळ..

****

बऱ्याचदा मला वाटते बसावे एखाद्या समुद्र किनारी, मोबाईल स्विच ऑफ करून,

एकटक पाहत रहावे त्या मावळत्या दिनकराला डोळे भरून..

मिटून डोळे मारावा सूर मनाच्या खोल गर्तेत, आणि अनुभवावी ती सागराची गाज,

करावा संवाद तुमचाच तुमच्याशी, ऐकू येईल मग तुम्हाला अंतरात्म्यातील आवाज..

बंद करावी ती बाह्य जगातील सर्व कम्युनिकेशन्स,

मग येत राहतील तुमच्या समोर आठवणीतील नोटिफिकेशन्स..



******.********

पहिली स्पर्धा, पहिली परीक्षा, पहिल्याच अपयशाने आलेलं नैराश्य,

खोलीत बंद करून स्वतःला, मीच माझ्याशी केलेलं ते भाष्य..

पहिलं प्रेम, पहिला स्पर्श, पहिल्याच भेटीने झालेला तो हर्ष,

जगण्याच्या धावपळीत कुठे बरं हरवली ती मधली वर्ष..

अशा एक ना असंख्य आठवणींनी मन जातं हरखून,

भूतकाळात रमताना मग हळूच वर्तमानात पहावे निरखून..

****

"युअर बॅटरी इज लो" च्या आवाजाने आलो मी भानावर,

मनावर कितीही नियंत्रण ठेवले तरी ते एक मोकाट जनावर..

कधी कधी वाटते डू नॉट डिस्टर्ब च बटण ठेवावं दाबून,

पण "फीयर ऑफ मिसिंग आउट (फोमो)" च्या भीतीने विचार दिला तो झटकून..

आता ठरवलंय नोटिफिकेशन च्या चक्रव्युहात नाही राहायचं अडकून,

नको ते करायचे डिलिट आणि आवश्यक ते ठेवायचे राखून..

****

संदीप राठोड

नारी

नारी तुझी रूपे अनेक
आई, बहीण, बायको, लेक|
कोणते एक नाव घेऊ,
सारे सरस,एका पेक्षा एक ||
जन्म ,जीवन, जगणे तू,
प्रेम, माया, जिव्हाळा |
जगण्यास हुरूप देई आगळा,
जरी प्रत्येक नात्याचा रंग वेगळा

दाखवी मार्ग, करत दूर अडथळा
घडवी आयुष्य सुंदर
शिकवी घेण्यास श्वास मोकळा ||

धैर्य, प्रेम, संयम, निष्ठेने,
जिंकलेस जग तू कष्टाने |
ऋणात तुझ्या नतमस्तक
अशक्य कधी हे फेडणे ||

भारावून तव त्यागाने,
केवळ करू शकतो आम्ही नमन प्रेमाने ||
लाभले भाग्य आम्हास
प्रत्येक रुपात घडला तुझा सहवास
नाहीतर;
तुझ्याविना जीवन प्रवास
म्हणजे नुसता खडतर वनवास ||

मोनाली नवले

|| पैलतीर||

आज अवचित घडले सारे,
पार्थिव शरीर माझे मज भेटले कसे..|
स्वप्न हे जणू, मायाजाल भवती,
पैलतीराचे सत्य मज स्पष्ट दिसे ||

शांत, निशब्द किंकाळी,
अव्यक्त चेहरा रे मनाचा..|
भयान प्रवासारंभ हा आता,
की अंत हा प्रवासाचा ||

ना जिंकलो, ना हरलो मी,
ना प्रकाश, ना अंधार मी..|
झुरलो करता करता मी, मी!
नावच काय, कणभर न उरलो मी ||

काय दूषित, अन काय निर्मळ?
हर्षही नाही, अन दुःखही नाही..|
काय अग्नीदाह, अन काय शितल?
बधिर,बोथट भावनाही नाही ||

कुठे न जाणे, न कोणी येणे,
मातीमय काया, मातीच होणे..|
स्वर्ग न कुठला, नर्कही नाही,
कसले रे फेरे? न येणे न जाणे ||

नंतर ना काही रे, जे आहे ते आज,
प्रेम, करुणा, वात्सल्य, दया, माया..|
कर निद्रात्याग, वेळ न गेली अजूनही,
आहेस सजीव तू, अन तुझी काया. ||

अनंत निमकरडे

ललित



चराति चरतो भग:

सातत्याने प्रयत्न केल्यानेच यश येते; नुसते बसून राहिलात तर तुमचे भाग्यही बसकण मारेल, अशा भावार्थाच्या एका संस्कृत श्लोकाचा शेवटचा चरण “**चराति चरतो भग:**” असा आहे.भावार्थ खूप व्यापक असला, तरी मी मात्र ‘व्यायाम होईल अशा प्रकारे चलन-वलन करणाऱ्याचे आरोग्यही चांगले चालते-फिरते राहते’ असा मर्यादित अर्थ घेऊन त्याबाबतचे माझे अनुभव तुम्हाला सांगणार आहे.

लहानपण छोट्या गावांतून (तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी) गेल्याने चालायची सवय लागली, आणि कदाचित त्यामुळेच आवडही निर्माण झाली. पुढे I.I.T. (Madras – आताची चेन्नई) ला गेल्यावर तिथे उपलब्ध असलेल्या सोयींमुळे, gymnastics, weight training, थोडेसे swimming असे उद्योग करून शेवटची दोन वर्षे मात्र योगासने आणि jogging व walking यावरच भर होता.आठवड्याचे पाच दिवस, track वर जाऊन ४०० मीटरच्या दहा फेऱ्या आणि शनिवारी, मी jogging करत व मित्र सायकलवर अशी campus main gate ची ८ किलोमीटरची एक फेरी अशी साप्ताहिकी होती. बाकीही गोष्टी चालू असायच्या, पण त्या या ‘साप्ताहिकी’ला बाधा आणू नयेत, असे लक्ष ठेवले.

शिक्षणानंतर नोकरी, प्रपंच, येणे-जाणे हे चालू झाल्याने चालणे कमी झाले, तरी योगासने नियमित चालू होती.पण चालायची आवड काही कमी झालेली नव्हती, म्हणून तिसावा वाढदिवस **Charity fund raising** साठी आठ मैल चालून साजरा केला.नंतर वाढत जाणाऱ्या प्रापंचिक जबाबदाऱ्या आणि वय या गडबडीत जरा चालढकल

सुरु झाली, आणि हा-हा म्हणता पन्नाशी दोन वर्षावर कधी आली आणि वजनात इतकी वाढ कधी झाली ते कळलेच नाही.

त्यामुळे '**चराति चरतो भग:**' या वचनापासून पुन्हा एकदा स्फूर्ती घेऊन, आठवड्याचे पाच दिवस gym मध्ये तासभर cross-trainer, काही ५० पौंड, काही १०० पौंड अशी weight-training machines वर repetitions करून एकूण १४००० पौंड हलवा-हलवायचे, असे "व्रत" दोन वर्ष पाळलं.त्यामुळे Diet च्या कुठल्याही प्रकारच्या fad च्या नादी न लागता, वजनाची पातळी पन्नासाव्या वाढदिवसापर्यंत पुरेशी खाली आली.

त्यानंतर रोज सकाळी **Required daily Minimum stretches & Exercise** झाल्याशिवाय दिवस सुरूच करायचा नाही, असा वसा घेतला.मग जशी साठी जवळ येऊ लागली, तसं आता साठी special काय करावं असा विचार करताना, चालायची आवड आहे तर 'साठावा वाढदिवस सहा दिवसात साठ मैल चालूनच का साजरा करू नये?' असा विचार आला. त्यानुसार चार वर्षांपूर्वीपासूनच एप्रिल ते नोव्हेंबर या महिन्यात, आठवड्याला पंचवीस मैल, पण त्यातील दहा मैल शनिवार किंवा रविवारी सलग चालायचे, असा नेम सुरू केला. म्हणून प्रत्यक्ष साठावा वाढदिवस आला तेव्हा सहा दिवस रोज दहा मैल चालायला त्रास झाला नाही.

त्यानंतर सकाळच्या stretches & Exercise मध्ये काही फरक झाला नाही, तरी चालणं आठवड्याला १२ ते १५ मैलांवर आलं. माणूस म्हटला की मोह आणि चालढकल असणारच. मात्र त्यावर प्रतिबंधक उपाय म्हणून आंघोळ झाल्यावर वजन करायचं, आणि तीन ते पाच पौंडापर्यंत वाढ चालवून घेतली.
पाचापर्यंत वाढ झाली की तीन-चार महिने "No अबर-चबर आणि १५ ते १८ मैल साप्ताहिक चाली-चाली" हा नियम अमलात आणायचा, असे ठरवलं.

'**चराति चरतो भग:**' चे माझं interpretation असं साधं आणि नीट अमलात आणलं, तर उपयोगी ठरणार आहे, हे मी स्वानुभवानं सांगू शकतो.
Diabetes च्या दृष्टीने genetically मी high risk group मध्ये आहे. दीड वर्षात मी सत्तरी गाठेन, पण अजूनतरी त्याला दाराबाहेर ठेवण्यात मी यशस्वी झालो आहे.

हे माझे व्रत असेच यापुढेही चालू ठेवण्यासाठी आवश्यक ती मनाची शक्ती मला मिळो हीच प्रार्थना करून हा लेख मी संपवतो.
तो **सुशांत**ला email केला की माझा आजचा तीन मैलाचा quota पुरा करण्यासाठी बाहेर पडायला मी मोकळा !!!

सुधीर ओक

सिल्वर लायनिंग

“ताई, मी आज लवकर घरी जाऊ? त्यो मेला कालपासून पिऊन पडलाय... घरातच.. जिता हाय का नाही ते तरी बघत्ये एकदा,” गंगूचे शब्द ऐकताच सुचेतानं लॅपटॉपवरचं काम थांबवून तिच्याकडे बघितलं.

“गंगू, असं काय बोलतेस? जा बरं घरी पटकन आणि बघ त्याच्याकडे!” सुचेताने गंगूचा पगार तिच्या हातात ठेवला. वर शंभर रूपये जास्त दिले.

“अग, ताई काय वाईट बोलल्ये मी? त्याला सांगितलं...
भाईर पिऊन रस्त्यावर पडण्यापेक्षा घरीच पी. रस्त्यावर पडतोय कुटतरी, अन् मग शोधून घरी आणावं लागतं... आता घरीच पितुया. ते फार चांगलंय.” गंगू पगार झाल्यानं खूष झाली होती. मटणाचे भाव लई वाढलेत म्हणत तिनं पैसे तिच्या लाल रंगाच्या चंचीत ठेवले.

सुचेता काही बोलली नाही, पण बाबांचं व्यसन आई व आपण गंगूसारखं कधीच स्वीकारू शकणार नाही याची तिला परत एकदा जाणीव झाली. बाबा त्यांच्या उच्च वर्तुळातील मिटींग्जमध्ये पिऊन घरी आले की, ती व आई कोमेजून जात असत. दुसऱ्या दिवशी बाबा “परत कधी घेणार नाही” म्हणत, केवळ पुढच्या वेळेपर्यंत! त्याला काहीच अर्थ नव्हता. पण बाबांना घरी पिऊ द्यावं हे आईला कधीच मान्य नव्हतं. आईला रडत बसलेली बघून सुचेतालाही रडवेली व्हायची.

गेली पंचवीस वर्षं गंगू सुचेताकडे कामाला होती. दोन मुली व एक मुलगा होता. नवरा असून नसून सारखाच होता. तो दारू पिण्यासाठीच जन्माला आला होता. किराणा मालाच्या दुकानात बरी नोकरी होती, पण ती त्याच्या दारूमुळं टिकली नाही.

“ताई, तो मनानं लई चांगला आहे.. आपण दारू पिणाऱ्यास शिव्या देतो, पण मानूस का प्यायला लागला हे कधी बघत नाही... हाल झालेत त्याचे..” गंगू त्याची कुठली चांगुलकी घेऊन सारवासारव करत बसली होती ईश्वराला ठाऊक. ती त्याला अस्सल ठेवणीतल्या शिव्या मोजत असे, पण नंतर मटण भाकरी खायला घालत असे. भुगा झालाय शरीराचा म्हणून दूध पाव देऊन त्याला झोपवत असे.

गंगूच्या संसाराचं वस्त्र छप्पन ठिगळं लावूनही फाटत आलं होतं. पण तरी ती ते पूर्ण फाटू न देण्याचा तिचा निश्चय कधीच डळमळला नाही. कौशल्यानं ती एकेक नवं ठिगळ जोडत राहिली! मोठ्या मुलीनं, मीनाने, एका ख्रिश्चन तरूणाबरोबर पळून जाऊन लग्न केलं तेव्हा सुचेतानं गंगूकडील नव्या शिव्यांचा साठा ऐकून कान झाकून घेतले.. पण त्यानंतर पोरं सासरी गेली. मी तिची नीट पाठवणी केली नाही, म्हणून डोळ्याला पदर लावलेलाही सुचेता बघत होती! मीना पळून गेल्याच्या तिसऱ्या दिवशी गंगू कामाला आली ती बदाम वेलदोडा घातलेला शिरा घेऊनच!

"ताई, किरीस्तावाशी लग्न केलं मीनाने, एवडं सोडलं तर बाकी समदं उत्तम आहे. प्रामाणिक आहे मुलगा. त्याचं हॉटेल आहे, भरपूर पैसा मिळतो. स्वताचं घर आहे. सासू-सासरं नाहीत मीनाला. काय वाईट आहे? त्यो म्हनं चर्चला घेऊन जातो मीनाला, अन् किरिस्ताची गाणी शिकवूया! काय बी वाईट नाही. समदे देव सारखं बघ. समदे चांगल्या गोष्टीच करा म्हनतात.. आणि दारू न पिणारा मानूस म्हणजे देवच की! छान आहे जावई माझा. बायेस झालं मीनाचं!"

दोन दिवसात आहे त्या परिस्थितीचा स्वीकार करून, तिचं तिनं स्वत:साठी जे तत्त्वज्ञान बनवलं ते ऐकून सुचेता चकित झाली होती. धर्म बदलला म्हणून मुलीशी नाळ तोडलेले तिचे काका-काकू नातवंड झालं तेव्हा जळाबाहेरील माशासारखे तडफडले होते, पण त्यांनी लेकीला माफ केलं नाही की नातू बघितला नाही. सतत पूजा-पाठ करणारे काका पारशी माणसाशी लग्न केलेल्या लेकीला कधीच क्षमा करू शकले नाहीत.

आणि ही अडाणी गंगू.. दोन दिवसात लेकीला माफ करून मीनाचं कसं चांगलं झालं साऱ्यांना ऐकवत होती. नात झाली तेव्हा लेकीचं बाळंतपण मनापासून करत होती. "ताई, अळवाचे लाडू करू का मीनासाठी?" विचारून दोन लाडू सुचेतालाही खायला घालत होती.

गंगूची धाकटी, शलाका, हुशार निघाली. सरकारी कचेरीत कसलीशी नोकरी करत तिनं तिथल्या एका पोलिसाशी लग्न करून गंगूला सुखाचे चार दिवस दाखवले. पण गंगू सुखानं जगायला जन्माला आलीच नव्हती.

किर्तनाला गेलेला तिचा लेक, सदा, हार्ट अटॅक येऊन जागच्या जागीच गेला, अन् गंगू उन्मळून पडली. यातून गंगू सावरणार नाही वाटत असताना, मुलाचे दिवस करून कामाला आलेली गंगू सुचेताला म्हणाली,
"ताई, बरी आहेस नव्हं? डोळ्याखाली लई काळं दिसतय.. भांडलीस की काय सायबांशी?"

"तापातून उठले आहेस ग, गंगू. तुझा सदा गेला कळलं, अन त्याच रात्री एकदम ताप भरला मला. माझ्या जीवाला त्याचं जाणं आणि तुझे हाल झेपले नाहीत." सुचेता छताकडे बघत होती.

गंगू खिन्न चेहऱ्यानं हसली.
"अगं ताई, मानसाची जन्मायची व जायची वेळ ठरलेली असतीया. सदा किर्तनाला बसला होता! आवडला विठूरायाला. म्हणाला... चल रे सदा..हा तयार झाला. आता इतं राहून तरी कुळ युध जिंकायचं आपल्याला? चांगलं झालं त्याचं. आपल्याला काय आपलं मानूस हवच असतं. मी कंबर कसून उभी आहे बघ सुनेच्या व नातवाच्या पाठीशी...त्या पोरीचं चांगलं झाल्याशिवाय डोळं मिटणार नाही मी.. नातू हुशार आहे माझा!

गंगू डोळे पुसता-पुसता हसत होती.
"माझं आयुष्य लई चांगलं गेलं बघ. दुःख आलं नशीबी पण ताई, प्रत्येक दुःखात ना कायतरी चांगलं दडलं होतं बघ. ते मी शोधायला शिकलो, म्हणून समदं चांगलं झालं.. नरक म्हणजे काय दुसरं नाही, ताई.. जन्माला येऊन दुःखातलं सुख न दिसणं म्हणजे नरक. लई दिलं देवानं! काय बी तक्रार नाही माझी!"

तिनं हात जोडले. त्या रापलेल्या चेहऱ्यावरून फक्त कृतज्ञता ओघळत होती. देवावर राग नव्हता, की नशीबावर राग नव्हता. कुठल्या तोंडानं ती तक्रार नाही म्हणत होती, तिचं तिलाच ठाऊक!

महिनाभरात तिच्या कपाळावरच्या कुंकवाचा धनी पण दारू पिऊन गेला तेव्हा तिच्या डोळ्यातून पाण्याचा थेंब आला नाही. ती त्याच्या तिरडीजवळ शांत बसली होती. मयताला आलेल्या लोकांकडे बघून म्हणाली,
"गेला ते बरं झालं.. दारू तरी सुटली. आपल्या समाजाचा या दारूने लई नाश केलाय.. किती कुंकवं पुसली.. आता तरी शिका आणि सोडा दारू नाहीतर रोज एका मयताला जाऊ आपण सगळे." तिचा थरथरणारा आवाज तेथील स्तब्धता चिरत गेला. रोज दारू पिणारे काही महाभाग मान खाली घालून उभे होते.

फारशी आशा न ठेवता, गंगू काहीबाही बोलत राहिली, आणि बायां-बापडे ते ऐकत राहिले.

सुचेतानं तिच्या लॅपटॉपकडे बघितलं. एक मेसेज फ्लॅश होत होता. बुध्द तत्वज्ञानाच्या एका कोर्ससाठी ती नाव नोंदवत होती. स्क्रीनवर मेसेज होता:

"बुध्द टिचिंग्ज वर्कशॉप"
"Be happy not because everything is good, but because you see good in everything"
Register in the next 10 mins to save your spot..

गंगू आतून चहा घेऊन आली.
"लई अंधारून आलंय ताई.. चहा घे. काम झालं नव्हं? मुगाची खिचडी टाकू का? खाऊन घे दोन घास!"

तिनं उठून गंगूला कडकडून मिठी मारली. हे चालतबोलतं तत्वज्ञान समोर असताना तो कोर्स काय नवीन शिकवणार होता? शाळा न शिकलेली गंगू काय बुध्दाकडे कोर्स करायला गेली होती? संकटांच्या सतत धगीतून आणि ती रोज गाणाऱ्या अभंगातून तिचं ते तत्वज्ञान साकार झालं होतं!

गंगू गोंधळून गेली होती. ताईला आपल्यासाठी वाईट वाटतंय? गंगू सुचेताची पाठ थोपटत होती.

"ताई, माझ्यासाठी नको वाईट वाटून घेऊ. मी छान आहे. तुझ्यासारख्या जीवाभावाच्या, नोकर माणसाला समजून घेणाऱ्या मॅडमकडं मी नोकरी करते. उसनं पैसं मागते. काय खाल्लं, काय प्यायलं, तू कधी काही विचारत नाहीस.. मला धीर देऊन उभं करतेस.. तू आहेस म्हणून बळ येतं पुढचा घाव सोसायला. यापेक्षा काय हवं माणसाला?"

Every cloud has a silver lining!
ते ज्याला बघता आलं त्यानं सारं काही मिळवलं. कुणाच्या आयुष्यात काळे ढग येत नाहीत? पण त्यामागे लपलेलं इंद्रधनुष्य बघता आलं पाहिजे. ती रूपेरी कड शोधता आली पाहिजे! ते बघण्याची इच्छा व सामर्थ्य असावं लागतं. ते केवळ आपल्या साधनेतून निर्माण होतं! सुचेतानं डोळे पुसले.

लॅपटॉपवरील बुध्दाच्या कोर्सची विंडो केव्हाच बंद होऊन गेली होती.. **Expired** असा मेसेज दिसत होता.

आकाशात काळे ढग दाटून आले होते.. कधी कोसळेल माहित नव्हतं.

त्या ढगांची चंदेरी कड शोधण्यात सुचेता रमून गेली होती!

©® ज्योती रानडे

सत्य घटनांवर आधारित

The Peacock and the Crane

There was once a very beautiful peacock who always used to brag to other animals about her feathers. One day, while the peacock was drinking water, a crane also happened to be at the lake. The peacock looked at the crane and made a disgusted face.

The crane looked at the peacock and said, “Why are you looking at me like that?”

The peacock replied, “You have dull feathers, while mine are colorful and majestic. Yours are as dull as a piece of stone.”

The crane then said, “Your feathers might be beautiful and mine might be dull, but at least I can go and explore the world’s beautiful places. I can fly high over the world and enjoy the view, while you just sit there and boast about your feathers.”

The peacock felt very ashamed and begged the crane’s forgiveness.

Moral of the story: You should not criticize anyone’s appearance.

Soham Birajdar, Age 10

बॉस्टन

अमेरिकेमधील बॉस्टन या शहरात प्रवेश करताना एक वेगळीच vibe जाणवली. काही जुन्या इमारती, काही नव्या इमारती, सुंदर कॅफे आणि तिथली सजावट, सायकल आणि त्याचे ट्रॅक्स, धावणारी माणसं... असं बरेच काही. हाईवेवरून जाताना अचानक आपल्याला शहरात प्रवेश केव्हा होतो ते कळत नाही. एक छोटा बोगदा, जणू अंडरग्राउंड वाटेल असा रस्ता, शहराच्या मध्यवर्ती म्हणजे डाऊनटाउनमधून जातो. ठिकठिकाणी बॉस्टन साईटसाठी असलेल्या बस आणि ट्रक लक्ष वेधून घेतात.

बॉस्टनला पोहोचताच खूप काही पाहण्यासारखे होते. पण आम्हाला सगळ्यात आकर्षित केलेली गोष्ट म्हणजे तिथली धावणारी माणसं, त्यात महिलांचं प्रमाण अधिक. कॅनडा आणि अमेरिकेत अनेक पार्क पाहिले, जिथे धावणारी माणसं कायम असतात. अगदी ७०–८० वर्षांच्या स्त्रीही इथे जणू ४०ची वाटते. यात काही नाविन्य नव्हते. पण बॉस्टनमध्ये ही पळणारी माणसं वेगळीच वाटली.

मी “Hop-on Hop-off” या साइटसीइंग बसमध्ये बसून फुटपाथवरून धावणारी माणसं पाहत होतो. काही तरी वेगळेपण जाणवत होते — एक प्रकारची उत्साह आणि ऊर्जा त्यांच्यात दिसत होती. या पळणाऱ्या माणसांना पाहून आणि मग कारण समजल्यावर मी या शहराच्या प्रेमात पडले.

It’s been called the best running city in America. बॉस्टन मॅरेथॉनची ओळख करून देण्याची गरज नाही: सहा मॅरेथॉन मेजर्सपैकी एक आणि जगातील सर्वात जुनी मॅरेथॉन म्हणून ही १८९७ मध्ये सुरू झाली. हा कार्यक्रम दरवर्षी ५,००,००० लोकांना आकर्षित करतो आणि प्रदेशातील सर्वाधिक पाहिला जाणारा क्रीडा कार्यक्रम ठरतो.

Kathrine Switzer या बॉस्टन मॅरेथॉनमध्ये अधिकृत स्पर्धक म्हणून धावणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या.

Kathrineचं धावण्याशी नातं अगदी लहानपणापासून होतं. मुलाखतीत अनेक वेळा सांगितलं की, वयाच्या १२व्या वर्षी तिने पहिलीच मैल धावण्याची शपथ घेतली होती. तिला वाटायचं की धावण्यात ती स्वतःला शोधू शकते, आणि ही एक स्वातंत्र्याची भावना तिच्या मनात दाटली.

1967 मध्ये Kathrineने निर्णय घेतला की ती बॉस्टन मॅरेथॉनमध्ये धावेल. पण त्या काळी महिलांसाठी ही स्पर्धा बंद होती. ती जरी घरी बसली असती, तरी इतिहास बदलला नसता. तिने नाव “K.V. Switzer” लिहून नोंदणी केली — ज्यामुळे अधिकारी लक्षात घेतले नाहीत की स्पर्धक महिला आहे.

रेस सुरू झाली, पण दोन मैलांनंतर एक अधिकारी, Jock Semple, ने तिचा धावण्याचा नंबर काढून टाकण्याचा प्रयत्न केला — कारण त्यांना वाटत होतं की महिलांनी मॅरेथॉनमध्ये भाग घ्यायला नको. तिच्या बॉयफ्रेंड Thomas Miller ने त्या अधिकाऱ्याला थांबवलं, आणि Kathrine ने धाव पूर्ण केली. ही धाव तिच्या आयुष्यातील आणि स्त्रियांच्या खेळाडूंच्या जगात क्रांतिकारक ठरली.

1967 च्या बॉस्टन मॅरेथॉनमध्ये विरोधाचा सामना करताना Kathrineला खूप राग आला — कारण तिला स्त्री म्हणून मान्यता मिळत नव्हती. पण ती म्हणते की, धावत असताना तिला राग कमी होऊ लागला आणि तिच्या मनात नवीन ऊर्जा आणि समाधान मिळाले.

धावण्यामुळे मेंदूमध्ये एंडॉर्फिनसारखे "हॅप्पी हार्मोन्स" निर्माण होतात, जे मनाला शांत आणि समाधानी करतात. धावताना मन शांत होते, विचार स्पष्ट होतात, त्यामुळे रागाच्या भावना कमी होतात आणि आपण परिस्थितीला नवीन दृष्टिकोनातून पाहू शकतो. शरीराची क्रिया सुरू राहिल्याने मनही सक्रिय आणि सशक्त राहते, त्यामुळे रागाला जागा मिळत नाही.

त्या रागाला तिने आपल्या जिद्दी आणि धैर्याने परावृत्त केले, आणि अखेर तो राग प्रेरणेत रूपांतरित झाला — ज्याने तिला बॉस्टन मॅरेथॉन पूर्ण करायला मदत केली.

सध्या त्यांच्या वय ७८ वर्ष असून त्या अजूनही धावतात — सरासरी आठवड्यात सहा दिवस धावतात. एक दिवस ८०० मीटर स्प्रिंट्स, एक दिवस दीर्घ धाव (किमान १.५ तास) करतात. त्या सांगतात, "कधीही कोणत्या वयात फिटनेस सुरू करता येते." त्यांनी एका उदाहरणाचा उल्लेख केला: "एक महिला ७२ वयात धावायला सुरुवात केली आणि ८१ वयात आपला पहिला मॅरेथॉन पूर्ण केला."

बॉस्टनला ऐतिहासिक वारसा लाभला आहे — वास्तूचा आणि दिग्गज लोकांचा. हे शहर ज्याला जे आवडत ते अनुभवायला देते: कॅफे, जुन्या इमारती आणि चर्च, समुद्र, स्पोर्ट, कला, युनिव्हर्सिटी, इतिहास, शॉपिंग, जगभरातील cuisine, आणि वॉरशीप सुद्धा पाहायला मिळतात. हे शहर प्रत्येकाला प्रेमात पडायला भाग पाडते.

पुन्हा बॉस्टनला येताना सुंदर नदीच्या काठावरून जाणारा ट्रॅक आणि सुमारे ९ ब्रिज क्रॉस करून जाणारा ट्रॅकवरून चालत बॉस्टनची मजा अनुभवायची आहे.

बॉस्टनला नक्कीच धावायला यायला हवे!

सोनाली ढपाले राऊत

A Letter to My Running Shoes Before Trip...

Look, guys, it's nothing personal. I've just come to terms with the fact that it's not going to happen this time. Yeah, this family trip is a full week, but I'm being honest with myself.
I might go for some walks. I might wander past the hotel gym, do 40 seconds' worth of curls — but I can do that in flip-flops. I can probably do it barefoot.

Running? It's been a while; I'm not sure I'm ready. We did have some good ones — that jog around the zoo in Indianapolis, and that time in the Smoky Mountains when we saw a timber rattlesnake. I nearly had a heart attack — from the jog, not the rattlesnake.

But I've been bringing you on trips for a good long while, and you haven't been getting off the bench. It's starting to feel like wishful thinking — and wasted room in the luggage. It's not your fault. You're eager, I know.

I'm still going to take care of myself on vacation. I clipped out that article in the magazine. I'm going to do the air squats. I'm going to do jumping jacks. I'm going to do sit-ups. I'm going to put my back up against a door — or something like that. I'm not going to eat carbs after 7:00 p.m. (or maybe 11:00 p.m.).

I'll be back before you know it. You're not even going to realize I'm gone. Until then, you should hang out with my snow boots, chat with my Kolhapuri chappals, go get a coffee with my heels. Think you have complaints? I haven't worn those heels in years. They hate me.

Are you crying? Please don't cry. You're going to make me cry — not more than going for a run would make me cry, but still.

I'm just being honest. This is not a breakup. We're going to have another time. Maybe next trip we'll go for a nice run — probably more of a walk — but it'll start. It's not nothing. I'll be back before you know it.

– Shraddha Birajdar

स्मार्ट टॉयलेट

न्यायदेवतेच्या डोळ्यावर पट्टी असते. कुणालाही भेदभाव न करता ती न्याय देण्याचं काम करीत असते.
Miguel Santosचं देखील थोडं तसंच असावं. अर्थात त्याचा न्याय देण्याशी काही संबंध नाही.

आमच्या Master Bathroom चा toilet flush खराब झाला. दुरुस्त करण्यासारखं नव्हतं, म्हणून नवीन toilet bowl आणि toilet flush tank घेण्याचं आम्ही ठरवले.

परत, चर्चा करता करता आम्ही Smart Toilet with heated seat, bidet with warm water jet, warm air mist for drying, automatic flush, power flushing even in power outage etc. etc. असलेलं फॅन्सी bells and whistles असलेलं Toilet निवडलं आणि Amazon वरून ऑर्डर केलं.

आमच्या घराच्या समोरची दोन घरं आणि शेजारचं घर ह्या तिन्ही घरांमध्ये बांधकामाची कामं जोरात सुरु असून बरीच बांधकामाची वाहनं (construction vehicles) रस्त्यावर उभी होती.
ह्या कारणाने Amazon delivery truck ला आमच्या घराच्या आवारात प्रवेश मिळाला नाही आणि ते त्या Toilet चा खोका आमच्या lawn वर पण अगदी रस्त्याच्या कडेशी ठेवून गेले.

आमच्या लक्षात आलं तेव्हा आम्ही लगेच तो खोका आत आणण्याचा विचार केला. पण तो बॉक्स फारच जड!
माझा मोठा मुलगा UConn च्या dorm मध्ये राहतो. मला, बायकोला आणि माझ्या धाकट्याला तो बॉक्स आत आणता येणं शक्य नव्हतं. म्हणून मी माझ्या मुलाला फोन केला. त्याचं काही तरी submission due होतं, म्हणून "मी उद्या संध्याकाळपर्यंत येईन" म्हणाला.

रात्रभर बॉक्स बाहेर ठेवण्यापेक्षा आम्ही विचार केला की आपण बॉक्स उघडू आणि आतल्या गोष्टी एक एक करून नेता आल्या तर जमू शकेल.
म्हणून आम्ही तो बॉक्स आमच्या lawn वर, रस्त्याच्या अगदी ३ फीट दूर उघडला.

सगळे bubble wraps, thermocol चे तुकडे, माझ्या धाकट्याने टाकून दिले. पण आमच्या लक्षात आलं की हा Smart Toilet! Bowl आणि Flush tank एकच unit! एक एक करून नेण्यासारखं काहीच नाही.

आता *आली* पंचाईत! खोका उघडून बसलो होतो. आत नेता येत नाही आणि मोठा मुलगा उद्या येणार! नवाकोरा Smart Toilet रस्त्यावर कसा ठेवणार? पण काही इलाज नव्हता.

नवा जरी असला तरी Toilet च तो. म्हणून मित्रांना, शेजाऱ्यांना बोलवायला जरा आम्ही संकोच केला. शेवटी आम्ही एक चादर/tarp त्यावर टाकला. Shubhan उद्या आला की आत आणू असा विचार करून घरात निघून गेलो.

सकाळी उठलो आणि बेडरूमच्या खिडकीतून tarp (ताडपत्री) टाकलेल्या Smart Toilet च दर्शन झालं.
शुक्रवार होता, आम्ही दोघे तयार होऊन सकाळच्या ऑफिसच्या meetingsला लागलो.

साधारण १०:०० वाजता "नाश्ता तयार आहे" असा हिने आवाज दिला. आम्ही स्वयंपाकघरात भेटलो.
मी machine मध्ये कॉफी लावली आणि Dining Roomच्या खिडकीतून परत आमचा Smart Toilet बघायला गेलो.

बघतो तर Lawn वर Tarp नुसताच पडला होता! Toilet गायब! आम्ही बाहेर धावत गेलो. इथे चोरी होणं काही शक्य नाही. मग गेला कुठे?

थोड्या वेळाने लक्षात आलं. तारीख होती Friday, April 4th. महिन्याचा पहिला शुक्रवार – Bulk Pickup Day!
South Windsor Town ची Bulk Pick Up टीम मधला Miguel Santos, डोळे झाकून, नवीन-जुनं ह्याचा भेदभाव न करता आमचं $४५० चे नवं कोरं Smart Toilet, Bulk Pickup चा कचरा समजून घेऊन गेला होता!

अर्थात ह्यात Miguel Santos ची तशी काही चूक नाही. नुसतं टॉयलेट स्मार्ट असून उपयोग नाही. त्या टॉयलेटचे यजमान देखील स्मार्ट असायला पाहिजेत.
Because of our non-smart conduct, we had flushed down $४५० down the Toilet (smart).

नमित ताम्हणे

मराठी शब्दकोडे

१	२	■	३	■	४	५	■
६		■	■	७			■
■	८		९		■	■	१०
११		■		■	१२	१३	
	■	१४	■	१५	■		■
१६	१७		■	■	१८		१९
			■	२०			
	■	२१		■		■	

आडवे -

१ व्ही शांताराम यांचा एक प्रसिद्ध मराठी चित्रपट

३ मठ्ठ

४ ….आई व्हायचंय, उर्मिलाचा एक मराठी चित्रपट

६ दरवाजा

७ या धाम मध्ये आपले बरेच कार्यक्रम होतात

८ हे यंदा दोनदा आपल्याकडे आले; एक खुनी आणि दुसरा गायक

११ ….लोटे, आपापसातली व्यवहार किंवा व्यवहारिक संबंध

१२ धन संपन्न

१५ वडील, पिता

१६ BMM चा एक उपक्रम

१८ नयनर
म्य

२० या आपल्याला दार कार्यक्रमाना मेजवानी देतात

२१ गर्वाचे घर खाली, आता तिथे माती

उभे -

१ बेळगावचा एक प्रसिद्ध गोड खाद्यपदार्थ

२ CTMM च्या सर्वेसर्वा

४ पहिलवान

५ नफा, फायदा

७ ही लागली म्हणजे नियुक्त झाला

९ CTMM च सर्वांचं हक्काच व्यासपीठ

१० ….वढाय वढाय,बहिणाबाईंची रचना

११ सर्व उपचार पूर्णपणे पाळून केलेला

१३ CTMM आयोजित या वर्षीचा एक कार्यक्रम

१४ ढोल ताशा पथक

१७ गंध

१८ याचा हार केसात जातो किंवा पुरुष हातात

१९ चपाती बनवायला हि लागते

विनोद पाटील

आयुष्यातील मूल्ये आणि समाधान

आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहीकडे
वरती खाली मोद भरे , वायूसंगे मोद फिरे..

या बालकवींच्या लहानपणापासून ऐकत आलेल्या ओळी आजही कानावर पडल्या की आपोआपच मन सुखाच्या तारा छेडू लागते. खरं तर, आनंद ही व्यक्तिसापेक्ष भावना आहे. आनंदाला कोणतेही प्रमाण किंवा मोजमाप नसते. प्रत्येकाचा आनंद हा वेगवेगळ्या गोष्टीत दडलेला असतो. आनंद आणि मनःशांतीसाठी प्रत्येक जणच धडपडत असतो. काही लोक कमी साधनांतही जीवनाचा परिपूर्ण आनंद घेतात, तर त्याउलट काही सर्व असूनही असमाधानी असतात. आनंद आणि समाधान सारखे वाटत असले तरी दोघांमधे खूप तफावत आहे. आनंद ही एका ठराविक काळासाठी राहणारी भावना आहे, तर समाधान ही शाश्वत राहणारी एक प्रकारची वृत्ती आहे. आनंद हा भौतिक सुखावर अवलंबून असतो, पण समाधान ही आंतरिक तृप्तीची भावना असते. आपल्या यशाचे किंवा आर्थिक परिस्थितीचे मूल्यमापन करायला अनेक साधने आहेत , पण आपल्या समाधानाचे मूल्यमापन आपल्या मनस्थितीवरच अवलंबून असते. त्यामुळेच आयुष्यात यशस्वी होण्यासोबत समाधानी असणेही तितकेच महत्वाचे आहे, कारण यशस्वी व्यक्ती समाधानी असतेच असे नाही मात्र समाधानी व्यक्ती यशस्वी होऊ शकते.

'ठेविले अनंते तैसेचि रहावे | चित्ती असू द्यावे समाधान ||'

संत तुकाराम महाराजांनी वरील अभंगात म्हणल्याप्रमाणे जीवनात जे काही मिळाले आहे, त्याबद्दल कृतज्ञता आणि समाधान बाळगून यशासाठी प्रयत्न केला पाहिजे. ही समाधानी वृत्ती रुजण्यामागे व्यक्तीच्या आयुष्यातील मूल्यांचा वाटा मोलाचा ठरतो. मुल्याधिष्ठित वर्तनामुळे आयुष्याला योग्य दिशा मिळते आणि व्यक्ती समाधानी होते. विशिष्ठ पद्धतीनं मानवी मनाची मशागत करून मूल्यांचे बीजारोपण झाल्यास आनंदी आणि समाधानी आयुष्याचा पाया भक्कम होतो. मी शाळेत असतांना महाराष्ट्र शासनाने बदलत्या काळाची गरज म्हणून मूल्यशिक्षण नावाचा एक नवीन तास सुरु केला होता. मुलांच्या अंगी शिक्षणाच्या साहाय्याने मूल्य रुजवून राष्ट्राच्या भविष्याचा पाया बळकट करण्याचा त्यामागचा हेतू होता. हे सर्व मला त्या वयात जरी समजले नसले तरी आता पदोपदी मूल्यशिक्षणाची गरज जाणवते. मूल्ये व्यक्तीला व्यापक विचार करण्यास शिकवतात आणि त्याप्रमाणे जीवन जगण्याची प्रेरणा देतात. गणित, भाषा, शास्त्र या विषयांबरोबरच योग्य वेळी नैतिक मूल्यांचे बीजारोपण बालकांमध्ये केल्यास एक सुदृढ आणि सशक्त समाज निर्माण होऊ शकतो यात काही शंका नाही.

मूल्यांचे अनेक प्रकार असून त्यात शैक्षणिक, बौद्धिक, नैतिक, सामाजिक, अध्यात्मिक, राष्ट्रीय अशी बहुविध प्रकारची मूल्ये समाविष्ट होतात. नैतिक मूल्यांमध्ये मुख्यत्वे संवेदनशीलता, सौजन्यशीलता, प्रामाणिकपणा, आदर, वक्तशीरपणा, समानता, राष्टप्रेम, एकात्मता, श्रमप्रतिष्ठा ही मूलभूत मूल्ये अंगिकारली गेली पाहिजेत. आपल्या भारतीय संस्कृतीच्या इतिहासातून, संत-साहित्यातून आणि महापुरुषांच्या चरित्रातून मूल्यांचे महत्व सांगण्यात आले आहे. समर्थ रामदासांनी मानवी जीवनाच्या साफल्यासाठी "दासबोध" ग्रंथाची निर्मिती केली. यात त्यांनी उल्लेखलेली सर्व मानवी मूल्ये समस्त मानवजातीला सुखी आणि समाधानी जीवन जगण्याचा मूलमंत्र देतात.

ऐका निःस्पृहाची सिकवण । युक्ती बुद्धी शहाणपण

जेणें राहे समाधान । निरंतर

दासबोधातील वरील ओळींतून रामदास स्वामी निःस्पृहतेची लक्षणे सांगतात. निरंतर समाधानासाठी ही जीवन मूल्ये अंगिकारण्याची शिकवण देतात. सध्याच्या धावपळीच्या जगात त्यागसमर्पणादि नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत असतांना, दासबोध ग्रंथ समाधानी जीवनाची पायवाट दाखवतो.

मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचें कारण । मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छा ते

वरील उक्तीतुन जगद्गुरू संत तुकाराम महाराज मन प्रसन्न ठेवण्याच्या संकल्पनेतून मनुष्याला मानसिक सकारात्मतेचा सल्ला देतात. आपले मन हे प्रपंच, परमार्थ, व्यवहार अशा अनेक गोष्टींना कारणीभूत असते. मनाचा संचार सगळीकडे असतो. म्हणूनच मन स्थिर, संयमी आणि प्रसन्न असेल तर जीवन सुखी आणि समाधानी होते अशी शिकवण संत तुकाराम महाराज देतात.

महाराष्ट्रभूमीचे जनक छत्रपती शिवाजी महाराज तर नीतिमत्तेचे प्रतिक होते. जनतेप्रती संवेदनशीलता, स्त्रियांचा आदर, राष्ट्रप्रेम, त्याग, समर्पण, इत्यादी मूल्यांचे पालन करून त्यांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. भारताच्या महान स्वातंत्र्यसैनिकांनी राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता ही राष्ट्रीय मूल्ये युवकांमध्ये रुजवली. स्वच्छता हीच आरोग्याची गुरुकिल्ली मानणाऱ्या थोर समाजसुधारक संत गाडगेबाबांनी श्रमप्रतिष्ठा तसेच स्वच्छतेची मूल्ये समाजात रुजवली. **"बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले"** ह्या उक्ती प्रमाणे केवळ समाजाला उपदेश न देता त्यांनी स्वतः सेवाभावीवृत्तीतून मानवसेवेस जीवन अर्पण केले. सावित्रीबाई फुल्यांनी स्त्रीशिक्षणाची तर बहिणाबाईंनी सांसारिक सुख जपणाऱ्या मूल्यांची शिकवण समाजाला दिली.
थोडक्यात सांगायचे तर भारताच्या इतिहासातून विचारवंतांनी समाजाला वेळोवेळी मूल्यशिक्षणाचे धडे दिले आहेत आणि त्यातून समाधानी वृत्तीकडे पोहोचण्याचा मार्ग दाखवला आहे.

चित्त समाधान | तरी विष वाटे सोनें ।।
बहू खोटा अतिशय । जाणां भले सांगो काय ।।
मनाच्या तळमळे चंदनें ही अंग पोळे ।।
तुका म्हणे दुजा । उपचार पीडा पूजा

गेल्या भारतभेटीत आजीने संत तुकाराम महाराजांचा वरील अभंग ऐकवून त्याचा सारांश समजून सांगितला. मानसिक असमाधान असल्यास मनुष्याला सोनेही विषासमान वाटते. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा अतिशय घातक असतो. मन क्षुब्ध असेल तर शरीराचा दाह चंदनाचा लेप लावूनही कमी होत नाही. तुकाराम महाराजांच्या म्हणण्याप्रमाणे प्रपंच्याविषयी आसक्ती असलेल्या मनुष्याला कितीही मिळाले तरी तो कायम असंतुष्ट असतो. त्यामुळे आहे त्यात समाधान मानणे हेच सुखी आयुष्याचे रहस्य आहे.
या सुंदर अभंगाच्या ओळी थोडक्यात जीवनाचे सार सांगून जातात. माझ्या ९२ वर्षांच्या आजीने अतिशय सोप्या भाषेत मला हा अर्थ समजावला. तिचा तेजपुंज चेहरा तिच्या मूल्याधिष्ठित जीवनशैलीतून आलेल्या मानसिक संतुष्टेची जाणीव करून देत होता. आजही आमच्या घरावरून जाणाऱ्या प्रत्येक वाटसरूला आजी हक्कानं काही ना काही खाऊ घातल्याशिवाय पुढे जाऊच देत नाही. तिच्यासारखी प्रेमळ आणि मायाळू माणसे पाहिल्यावर आपण

आपल्या पुढच्या पिढीला काय दिले पाहिजे याची जाणीव होते. मन समाधानी असेल तर माया, आपुलकी, आस्था आपोआपच येते, हे मला प्रकर्षाने जाणवले.

थोडक्यात सांगायचे तर समाधान आणि समर्पण यांची सांगड घालून नैतिक मूल्ये अंगिकारल्यास जीवन आनंदी आणि यशस्वी होते. चला तर मग, नीतिमूल्यांचे अवलोकन करून आपण आपल्या हृदयात समाधानाची ज्योत सतत तेवत ठेवूया. सकारात्मक विचारांचे बीज रोवून नकारात्मक अंध:काराला हद्दपार करूया आणि म्हणूया..

"**आनंदाचे डोही आनंद तरंग, आनंदची अंग आनंदाचे** "

अनुप्रिया केंद्रे -कायंदे

A Day to Remember

Exactly on this day 29 years ago, on **21st Oct 1996**, two wonderful things had happened and I was lucky to witness both of those from a lovely little location with loving people. A location that couldn't have been more apt for one of the incidents. At Least.

It was a time when I used to work as a Commissioning Electrical Engineer for Siemens Ltd and I was posted with another fellow Engineer, Milind Wasekar at Rajasthan Atomic Power Plant (R.A.P.P.) located in a small town called **Rawatbhata** in Rajasthan about 60 KMs from Kota. We used to live in the Rajasthan State Govt provided guest house in a room that Milind and I used to share.

Oct 21st 1996 was a Monday and the festival of Dasra so the site had a Holiday. Spending the morning lazily, Milind and I went out in the town, had breakfast, did some shopping and came back to the guest house in time for lunch.

We finished our lunch and at approx. 2 PM settled ourselves into the guest house's big TV common Hall (there were no TVs in individual rooms at the guest house) to get ready for the One Day international cricket match to be played that day between India and Australia for the Titan Cup series.

The match was being played in Bengaluru and of course Kumble, Srinath and Prasad were the local lads. Australia batted first and scored 215/7 in 50 overs with some fine bowling by all 3 local lads.

Tendulkar led the charge from the start in the chase but kept losing partners on the other end. Finally Tendulkar himself got out when he was on 88 as the 8th wicket when the team's total was just 164. India were 164/8 in 42 Overs. 52 runs to get in 8 overs with just 2 wickets remaining. Likes of McGrath, Gillespie going strong and spewing fire. There was silence in the TV hall. The crowd had lost all hope with Tendulkar's wicket. Many of them got up and left.

But in came the local lads Kumble and Srinath. They batted with so much determination. They faced the gruesome attack with a lot of courage. A nudge here and a nudge there, singles, confusion, a stolen double, an

overthrow. It was all happening. Both their Mums sitting in the stadium and cheering loudly for every run they both scored was a sight to behold!

Every single run they both scored, the crowd in the TV hall roared and shouted and clapped and hugged each other.

With the pendulum of the match swinging wildly, drama at each ball, the marvelous duo of Kumble and Srinath helped India get over the finish line with an over to spare!

I have witnessed several down to the wire cricket matches. However, this one is special because of the ambience of the lovely crowd in the TV hall of Rawatbhata Guest House. Never have I ever High Fived and Hugged so many random strangers whom I would never meet again. When the match was over, I had chewed pretty much all of my finger nails.

The TV Hall was now less than half full. Milind and I kept sitting there and listening to the match synopsis, the award ceremony etc. By the time the award ceremony was over and we were about to get up to start making our way to the dining hall for dinner, we noticed that the TV hall was packed again.

When we enquired we were told that today there is some kind of season finale of the music show Sa Re Ga Ma and a 12 year old girl who coincidentally was from the town of Rawatbhata was singing in that episode which was the final round. Just for reference, Sa Re Ga Ma was (still is) a very popular national level TV show that scouts prodigal singers) – just think America's Got Talent for singers for reference. Since the girl was from Rawatbhata, the hall was again jammed packed.

I still remember the girl. 12 year old, petite, short cropped hair, wearing a moss green colored frock, stockings going above knees and black school uniform type buckled shoes. The crowd clapped and cheered each time her face came up on TV. "She is from our town, Rawatbhata", was told to us by several people within those 30 mins. "She is in my class", "she comes in my rickshaw", "I have gone to her birthday party", several claims were coming from girls who were sitting on the floor in front of the television.

But the girl sang truly beautifully. Melodious voice no doubt but the maturity in each note she displayed at that young age was remarkable. Sonu Nigam was impressed. We could tell. After the drama and suspense that reality television is supposed to display, they finally declared her winner.

The crowd roared with thunderous applause for the second time that evening. Uncle and Aunts that were 70+ were jumping with joy. Literally, jumping!

Congratulations were offered to one another, hugs were exchanged, sweet boxes were being opened and passed around, someone even blew a huge Conch. It truly was a touching spectacle.

Someone is going to win in a competition. Nothing unusual about that. But I could have been anywhere that day. But the fact that I was in this tiny town called Rawatbhata in Rajasthan, miles away from my home which was the hometown of this girl and who happened to be singing on the final of Sa Re Ga Ma that very day and winning made me feel a connection to her.

The next day the whole town had her posters and welcome placards pasted everywhere. Huge super sized cut outs saying “Rawatbhata’s daughter”, “Rawatbhata’s honor” planted at central locations across the town. It was magnificent to witness all that as we sped through our company jeep each day to the power plant.

The same girl, after 4 years, would go on to win the Sa re Ga Ma adult championships. The girl would eventually go on to become one of the leading singers in the Indian Film Industry and going strong even today after 29 years.

The girl’s name was Shreya Ghoshal.

All in All, not only did I spend a remarkable evening on this day 29 years ago in Rawabhata, but also, I feel I witnessed an event that would prove to be pivotal in making one of the finest singers of the Indian film industry.

Namit Tamhane

21st Oct 2025

टिप्पेश्वर आणि ताडोबा भटकंती - वाघ अनुभवणं

मार्च एप्रिल मे म्हणल्यावर आमच्या सारख्या भटक्यांचे प्लॅन्स होतात सफारींचे..त्यातून गेली २-३ वर्षे corona मुळे कुठे जाता आले नव्हते मग आम्ही प्लॅन केला ह्या वेळेला टिपेश्वर ला जायचा..मग मेंबर गोळा करणे सुरु झाले आणि ११-१२-१३ जुन चा प्लॅन झाला. पटापट आधी परमिट बुक केले , विमान तिकिट्स बुक केले आणि नवीन कॅमेऱ्याचे सगळे सेटीन्ग्स वगैरे बघणं सुरु केले..तेंव्हाच लक्षात आले कि सोमवारी टिपेश्वर बंद असते..आता फक्त आमच्या तीनच सफारी होणार होत्या. आम्ही वेग वेगळे पर्याय पाहिले आणि शेवटी ठरवले कि रविवारची सफारी झाली कि थेट ताडोब्यात जायचे. तिकडे सकाळ संध्याकाळ सफारी बुक केल्या कारण विमान रात्री ११:३० चे होते.

आणि निघायच्या ३-४ दिवस आधी एक जणांच्या पायाला गाडीच्या सायलेन्सर चा चटका बसला आणि त्यातुन जखम चिघळत त्यांचं येण्याचे कॅन्सल झालं. आता परत चौथ्या मेंबर साठी शोधाशोध सुरु झाली, आणि नशिबाने एक मित्र तयार झाला.

आता विमानाची तिकिट्स बुक करतोय तर रिटर्न चे विमान त्याला दिसले नाही. मी म्हणालो अरे बुक केले आहे आम्ही, तू कॉल कर कस्टमर केअर ला..तर अजून एक बॉम्ब पडला ..परतीचे विमान कॅन्सल झाले होते..मग काय परत शोधाशोध करून दुसऱ्या दिवशी पहाटे ४ चे विमान बुक केले.

शेवटी हि सगळी विघ्न पार करून एकदाचे विमानात बसलो गो एअर चे ७.१५ ला विमान होते पुणे ते नागपूर. पण ७.३० झाले तरी ते धावपट्टीवरच शेवटी ७.४५ ला उड्डाण केले आणि नियोजित वेळेच्या अर्धा तास उशिरा नागपुरात पोहोचलो. तिकडे २ जण पेंच हुन आले होते त्यांनी पिकअप केले आणि गाडीने यवतमाळच्या दिशेने कूच केले. जाम्ब ला एकदम जम्बो नास्ता केला जसे कि सामोसा सांबार, डोसा , इडली, मेदू वडा आणि डाळिंबाचे सरबत..आणि मग थोड्याच वेळात आम्ही AH ४३ ह्या रस्त्याला लागलो..हा रस्ता पार दिल्ली पासून पुढे कन्याकुमारी पर्यंत जातो. २ एक तासांनी आम्ही आतल्या रस्त्याला लागून टिपेश्वर च्या दिशेने लागलो. त्या भागात अजून जास्त हॉटेल्स रिसॉर्ट्स नसल्याने एका होम स्टे मध्ये आम्ही उतरलो . हि जागा जंगलाला एकदम लागून असून तिथून सफारी गेट साधारण १.५ किमी वर आहे. हि जागा मथनी गेट ह्या बाजूला आहे. पटापट फ्रेश होऊन जेवायला बसलो..विधर्भी जेवण असल्याने नुसती लाल चॉकलेटी तर्री आणि बऱ्यापैकी तिखट

जेवण पण चविष्ट होते. जेवण झालो आणि सगळं लटाम्बर घेऊन जिप्सी मध्ये बसलो. जिप्सी चालवणारा सरदारजी होता पण आश्चर्य म्हणजे तिथल्याच मथनी ह्या एकदम खेड्यातला राहणारा असल्याने अस्खलित मराठी बोलणारा होता. जिप्सी ने निघालो आणि गेट वर आलो..वातावरण एकदम अचानक बदलले आणि लांबवर पाऊस दिसायला लागला..पटापट सगळे सोपस्कार पार पडले आणि आमच्या जिप्सी ने पहिली एन्ट्री घेतली..ज्यांनी जिप्सी मध्ये बसून जंगलात जाण्याचा अनुभव घेतला असेल त्यांना जाणवेल तो क्षण किती भारी असतो ते.

(तुम्ही ओळखलं असेलच , डावीकडचा अस्मादिक आहे :))

तर टिपेश्वर मध्ये ३ वाघिणी आहेत आणि त्यांना प्रत्येकी ३ पिल्लं आहेत आणि म्हणून आम्ही ठरवले होते इकडे जायला.. नेहेमी प्रमाणे शोध मोहीम सुरु झाली. उन्हाळ्यात पाण्याची कमतरता असल्याने वाघ हमखास पाणवठ्यावर येतात.. टिपेश्वर हे नाव तिपाई ह्या देवीच्या मंदिरावरून पडले आहे, हा भाग एकदम उंच सखल असा आहे. इकडच्या जिप्सी फारच खराब होत्या..पण जंगल सफारी म्हणल्यावर खपवून घ्यायचे असे ठरवले.. ४-४.३० झाले होते पण काहीच कुठेच हालचाल दिसत नव्हती..वातावरण पण एकदम ढगाळ आणि पावसाळी झाले होते. आणि तेवढ्यात गुरमीत (ड्राइवर) ह्याला फोन आला कि वाघीण दिसते आहे दरीत. आम्ही लगेच तिकडे मोर्चा वळवला. आणि मग ती दिसली..आर्ची - A मार्क असल्याने आणि सैराट तेंव्हा एकदम हिट असल्याने तिचे हे नाव ठेवले होते.

हळू हळू ती वरती येत होती रस्त्याकडे. पण रस्त्यावर तिच्या समोरच २ जिप्सी आणि मागे आमची जिप्सी होती ..त्यांना म्हणालो कि पुढे सरका आणि तिला जागा द्या वरती येण्यासाठी आम्हीही आमची जिप्सी मागे घेतली. हे सगळे होई पर्यंत ती शांत पणे बघत होती.. आता हि सुवार्ता कळल्याने सगळ्या गाड्या आमच्या मागे येऊन लागल्या आणि मोबाईल कॅमेरे बाहेर निघाले. आमच्या अंदाज नुसार ती बरोब्बर वरती आली आणि आमच्या समोर आली. आम्ही हळूहळू जिप्सी मागे घ्यायला लागलो जेणेकरून तीला चालायला मिळेल आणि आम्हला फोटो पण मिळतील. पण पण...गाड्या मागेच जायला तयार नाही आम्ही ओरडून

सांगतोय तिला चालायचे आहे मागे घ्या पण कोणीच ऐकायला तयार नाही सगळ्यांना मोबाइल मध्ये फोटो काढायचे होते..वाघिणीने २-४ मिनिट्स वाट पाहिली पण काहीच घडत नाही म्हणल्यावर तिने रस्ता सोडला आणि थेट उंच डोंगर चढायला सुरुवात केली. आम्ही इतके हताश आणि चिडलो होतो पण काहीच करू शकत नव्हतो...फोटो चांगले मिळाले होते पण गाड्यांनी ऐकले असते तर तिला पूर्ण रस्ता चालत आले असते.. असो अशा रीतीने आमच्या पहिल्या दिवसाची सांगता झाली...फोटो मिळाल्यावर लगेच आम्ही बाकरवड्यांनी पार्टी केली आणि स्टे ला आल्यावर जेवण एकदम साधं बनवायला सांगून फ्रेश व्हायला गेलो. रात्री तिकडे इतर बाजारबुणगे लोकं होती जी सफारी म्हणजे पिकनिक ट्रिप ह्या विचारांची होती ..जेवतांना त्यांनी अंडाकरी वरून इतका वाद घातला कि आम्हाला पण जेवण नीट जाईना. अक्षरशः शाळेत जसे आपल्याला शिकवले होते कि तारेवर १० पोपट असतील आणि ४ उडाले तर किती राहतील तसं त्यांचं चाललं होतं कि आम्हीं १२ अंडी सांगितली होती ४ खाल्ली उरलेली कुठे गेली. :). जाम वैतागलो होतो आम्ही आणि त्या स्टे चा मालक पण.. तर शेवटी ह्यांना इग्नोर मारले कारण भल्या पहाटे उठून सफारी होती आणि प्रवास बराच झाला होता. पटकन पडी टाकली आणि पहाटे ४.३० ला उठून ५.०० ला चहाचा घोट घेतला..

परत सगळं जामानिमा चढवला आणि गेट वर येऊन थांबलो. परत आमची जिप्सी पहिल्या नम्बर वर होती एक महत्वाचे कारण कि वाघांचे जंगली प्राण्याचे ठसे जमिनीवर असतात आणि त्यावरून आपण त्यांना ट्रॅक करू शकतो. नाहीतर गाड्यांच्या टायर मुळे ते पुसले जाते. थोड्याच वेळात आम्हाला वाघाचे पंजे दिसले एका मोठ्या वाघाचे ..आम्ही लगेच जिप्सी त्या बाजूला वळवली काही अंतर गेल्यावर ते ठसे आत मध्ये जंगलात गेलेले दिसले तरी आम्ही खूप पुढे जाऊन फेर फटका मारून आलो पण वाघ दिसला नाही. अगदी पहाटे त्याने मूव्ह केलेली होती. तर असच शोधत पुढे जात राहिलो, रस्त्याने ह्या वाघाचे पंजे दिसत होते म्हणजे तो ५किमी चालत होता हे दिसले. आम्ही आता एका सुंदर अशा तळ्यापाशी येऊन थांबलो जिकडे तालाबवाली वाघीण राहते. खूप मस्त वातावरण होते शांतता होती आणि मुख्य म्हणजे गाड्या नाही आणि लोकांचा कोलाहल नाही. बऱ्याच वेळ वाट पाहिल्यावर एक वाघीण दिसली झाडी मध्ये आणि आम्ही ट्रॅकिंग सुरु केले. तेवढयात एक गाडी आली, त्यांना आधीच दम भरला कि शांत बसा..सगळ्यांना नीट वाघ दिसेल. जवळच एक नाला होता तिकडे हरणं चरत होती.. तिने हळूच पोसिशन घेतली आम्हाला वाटलं आता मस्त एकदम action बघायला मिळणार पण त्यांना वाघाची चाहूल लागली आणि धूम ठोकली. हळू हळू ती पुढे जायला लागली. आमच्या लगेच लक्षात आले कि ती थोड्या अंतरावर एका ठिकाणी बाहेर येईल. आम्ही एकदम पुढे जाऊन आमची जिप्सी उभी केली आणि त्या गाडी वाल्याला सांगितले कि तू अलीकडेच थांब म्हणजे तुम्हाला पण दिसेल आणि आम्हाला पण दिसेल आणि मुख्य म्हणजे तिला जायला जागा मिळेल. त्या गाडीवाल्याने शांत पणे आमचे म्हणणे ऐकले आणि ती आम्हाला येतांना दिसली ..आमचा अंदाज होता त्या ठिकाणीच बरोब्बर ती बाहेर आली आणि मस्त पैकी आमच्या कडे बघत बघत रस्ता क्रॉस करून परत जंगलात निघून गेली.

खूप भारी पोझेस मिळाल्याने खुश होऊन लगेच बाकरवड्यांची मेजवानी झाली. आता एका उंच रस्त्याने खाली उतरलो वळण लागले आणि आणि मोठ्ठा वाघ येताना दिसला तो होता स्टार ..कारण त्याच्या डोक्यावर स्टार सारखी खूण आहे. हा ह्या जंगलातल्या सगळ्या पिल्लांचा पिता आहे आणि वय साधारण १४ वर्षाचे आहे. आम्ही पटापट पोसिशन घेऊन जिप्सी थांबवली.. फोटो काढणे सुरु केले आणि जसा जसा तो पुढे येऊ लागला, आम्ही गाडी मागे घेणे सुरु केले जेणेकरून त्याला डिस्टर्ब नाही होणार आणि फोटो पण मिळतील.

मधेच त्याने रस्ता सोडला आणि आतून चालायला लागला. आमच्या नंतर लक्षात आले कि आमच्या मागे परत गाड्या लागल्या आणि तो आवाज आणि कोलाहल त्याला सहन नाही झाला. आम्हाला माहिती होते कि तो परत बाहेर येणार म्हणून परत सगळ्यांना सांगितले कि पटकन आपण सगळे मागे जाऊन थांबू म्हणजे तो बाहेर येईल.. पण हाय रे कर्मा इथेही तेच गाड्या मागे जायलाच तयार नाही. मग वाघ अजून आत निघून गेला आम्ही तसेच पुढे निघालो दुसरीकडे म्हणजे सुन्ना गेट कडे कारण तिकडे पिलखान वाघिणीचे पिल्लं होती. तिकडे १-२ गाड्या होत्या तिकडे कळले कि आत पिल्लं आहेत आणि बाहेर येतील. पण हि पिल्लं लॉकडाउन च्या काळात जन्माला आल्याने त्यांना गाड्यांची सवय नाही आणि म्हणूनच खूपच लाजाळू आहेत.. आणि तसेच झाले ते पिल्लू (बऱ्यापैकी मोठे झालेले) बाहेर आले आणि इकडे तिकडे न बघता लगेच आत निघून गेले. मग आम्ही परत मागे फिरलो. एका ठिकाणी आम्हाला (किल) मारलेलं रानडुक्कर दिसले बराच वेळ तिकडे थांबलो पण वाघाची कुठलीच हालचाल न दिसल्याने स्टे वर परत आलो.

थोडी विश्रांती घेऊन जेवण करून सफारी साठी सज्ज झालो. आता आमची हि शेवटची सफारी होती टिपेश्वर ची आणि आम्हाला इतर २ वाघिणी आणि बच्चे पण दिसले नव्हते. भरपूर वेळ वेगवेगळ्या ठिकाणी फिरस्ती केली पण जंगल त्या दिवशी एकदम शांत होते आणि त्या दिवशी खूप गाड्या सोडल्या होत्या. टिपेश्वर मध्ये अजून एक प्रॉब्लेम म्हणजे खाजगी गाड्यांना परवानगी आहे त्याचा तोटा असा कि ड्राइवर ला माहिती नसते कि गाडी कशी चालवायची वाघा पासून किती अंतर ठेवायचे वगैरे. गाड्या मध्ये मेंढरं भरावी तशी लोकं भरली होती. वाघ दिसत नव्हता तर आम्ही गाईड ला सांगितले कि काही घुबड असल्यास बघुयात, त्या प्रमाणे त्याने एका ठिकाणी नेले आणि आम्हाला दाखवले एक झाड. ढोली मध्ये मस्त पैकी एक घुबड बसलेले दिसले

(indian scoups owl). माझ्या साठी ते lifer (म्हणजे पहिल्यांदाच दिसणे) होते. मस्त पैकी फोटो काढले परत जिकडे मेलेले रानडुक्कर होते

तिकडे जाऊन थांबलो. खूप वेळ वाट पाहिली आणि हळू हळू सूर्य अस्ता कडे जायला लागलेला. मग बसल्या बसल्या त्या निसर्गाची अनुभुती घेत शांत पणे बसलो आणि परतीच्या वाटेवर लागलो.. डोळे शोधत होते वाघाला प्रत्येक पिवळसर वस्तू वाघ दिसत होती :)... लॉ ऑफ ऍव्हरेजेस च्या नियमानुसार आज वाघ दिसणार नव्हता पण आम्ही पण खट्टू झालो नव्हतो कारण २ दिवस एका वेगळ्याच भागात वाघाला ट्रॅकिंग करायला आणि फोटो काढायला मिळाले होते. ३ सफारी मिळून ३ वाघ म्हणजे तसं नशीब चांगलेच होते. बाहेर पडायच्या आधी एका ठिकाणी मोर बसलेला दिसला आणि काही क्षणात मस्त पिसारा फुलवून नाचू लागला. वाघ दिसला नाही पण मोराचे नृत्य खूप छान दिसले.

होम स्टे ला परत आलो फ्रेश होऊन शांतपणे जेवण केले आणि ताडोबाकडे कूच केले साधारण रात्री ९.३० वाजता, रात्री बेरात्री १२:३० वाजता छावा रिसॉर्ट कोलारा जवळ पोहोचलो. पटकन चेकइन करून झोपलो कारण आमची सफारी दुसऱ्या दिवशी १५-२० किमी वर अंतरावर असलेल्या अलिझन्झा गेट वर होती आणि दुसरं म्हणजे आमची कॅब नव्हती त्यामुळे सकाळी सकाळी जिप्सी ने जायचे होते.



बरोब्बर पहाटे ४.३० ला चहा मारून निघालो, उघड्या जिप्सी मध्ये मस्त थंडगार वारं खात गेट वर पोहोचून पहिल्या नंबर वर जिप्सी लावली. आम्हाला तिकडे ड्राइवर ने सांगितले कि काल रात्री गेट जवळ वाघाने एका म्हशीला मारले आहे पण तो भाग दाट झाडीत असल्याने तिकडे जाता येत नाही. सोपस्कार करून निघालो जिकडे काल म्हैस मारली होती साधारण त्या बाजूला रस्त्यावर थांबलो काही वेळ आणि पुढे निघालो. जवळच एका ठिकाणी एक adult आणि तरुण गरुड (Crested Serpent Eagle) दिसले. पुढे गेल्यावर परत परवा दिसलेली घुबडं दिसली.. २ पिल्लं होती, छान पैकी फोटो आणि विडिओ घेऊन पुढे गेलो. आता एकदम उंच भाग ओलांडून पुढे गेलो खूपच सुंदर वातावरण होते पक्षांची किलबिल , वाऱ्याचा शांत आवाज.. एका ठिकाणी गेलो जिथे इतकी वेगळीच झाडे होती म्हणजे

मोठ्ठाले वेल होते आणि तो भाग एका वाघिणीचा होता. पुढे गेलो जिकडे शंकराचं पुरातन मंदिर आहे आणि दर सोमवारी तिकडे दर्शनाला लोकं जातात आणि त्याच भागात एक मोठ्ठा वाघ असतो. आणि महत्वाचे म्हणजे आजतागायत तिकडे कुठलेही अनुचित प्रकार घडलेले नाही. आमची शोध मोहीम चालू होती कुठे कॉल्स येतात का किंवा पंजे दिसतात का वगैरे आणि तेवढ्यात माझा मित्र सागर म्हणाला थांबा आत मध्ये झाडावर काहीतरी बसलेलं दिसतंय शेपूट आहे आणि हो बिबट्या..आम्ही वेडेच झालो गाईड सकट .. कि काय शोध लावला. आपल्या भागात झाडावर बसलेले बिबट्या दिसणं म्हणजे खूपच नशीब लागते. पटापट १-२ फोटो



काढले आणि त्याला काय वाटले कळले नाही तो झाडावरून खाली उतरला आणि डोंगराकडे निघून गेला. आम्हाला पुढची काही मिनिट्स खरंच वाटत नव्हतं जे काही पाहिले ते.. एक वेळ वाघ दिसू शकतो पण बिबट्या दिसणं आणि तेही झाडावर म्हणजे कमाल प्रकार होता. आम्ही आता परत थोडासा पुढे गेलो तर तिकडे खूप पक्षी दिसले. नवरंग, स्वर्गीय नर्तक ह्यांची घरटी, नीलिमा पक्षी वगैरे खूपच सुंदर परिसर होता तो. परत आम्ही काही ठिकाणी फिरलो आणि एका मोठ्या पाणवठ्यावर आलो जिकडे झरणी नावाची वाघीण असते. गाईड म्हणाला काल आम्ही गाडी लावली आणि २ मिनिट्स मध्ये ती पाण्यावर आली. आम्ही म्हणालो आज पण असच घडू दे..पण १०-१५ मिनिट्स शांततेत गेली आणि अचानक पलीकडून एक मोठ्ठअस्वल पाण्यावर यायला लागलं .अस्वल पण खूपच लाजाळू असल्याने आम्ही काही फोटो काढले पण तेवढयात एक जिप्सी मोठा आवाज करत आली आणि ते घाबरून आत पळाले. थोडा वेळ वाट पाहून आम्ही निघालो परत काही ठिकाणं शोधली आणि गेट वरून बाहेर आलो. जिप्सी घेतली आणि रिसॉर्ट ला आलो.

रिसॉर्ट वर मस्त पैकी नास्ता करून जरा विश्रांती घेतली आणि तयार झालो शेवटच्या सफारीला. २ सफारी ड्राय (वाघाच्या बाबतीत) गेल्या होत्या आता मनात वन देवतेला प्रार्थना केली कि आम्हाला आज चांगले काहीतरी दिसू देत. आम्ही कोलारा बफर मध्ये एन्ट्री घेतली , गाईड कडून सध्याच्या हालचाली वर चर्चा केली. शेवटची १५-२० मिनिट्स blacky (ब्लॅक लेपर्ड) ठेवायची असं ठरवलं आणि वाघाचा ट्रॅकिंग सुरु केले. ऊन बऱ्यापैकी असल्याने वाघ नक्कीच पाणवठ्यावर येणार असा कयास केला आणि सगळी पाणवठे पालथी घालणं सुरु केलं . तशातच काल तिथली वाघीण आणि नवीन वाघ एका ठिकाणी दिसला त्या भागात जिप्सी नेली. ते ठिकाण बऱ्यापैकी लांब होते पण आम्हाला ते शोधणं भाग होतं. फिरून परत आलो. ४ वाजले होते, हाताशी तीनच तास उरले होते. पटकन वॉशरूम साठी ब्रेक घेतला १० मिनिट्स आणि एका पाणवठ्याकडे गेलो. तिथे गेलो तर २-३ जिप्सी होत्या आणि ते म्हणाले कि आत्ताच वाघीण पाण्यात उतरली होती पाणी प्यायली आणि आत जंगलात जायला लागली. आम्ही हताश झालो , स्वतःवर राग व्यक्त झाला कि वॉशरूम ब्रेक मुळे



आम्ही त्या क्षणाला मुकलो. काय करावे करत नव्हते खूपच निराश झालो होतो. पण असे हात पाय गाळून उपयोगाचे नव्हते , आम्ही परत तिला ट्रॅक केलं तर ती जंगलात चालतांना दिसली. आता परत आम्ही आधीच पुढे गेलो , साधारण अंदाज घेतला कि ती कुठून बाहेर येईल आणि जिप्सी जाऊन उभी केली. सगळ्यांना सांगितले कि ह्या बाजूला पटापट येऊन उभे राहा म्हणजे ती रस्त्यावर येईल आणि सगळ्यांना समोरुन दिसेल व त्याच बरोबर आमच्या फोटो मध्ये मागे गाड्या येणार नाही. पण लोकं ऐकतात कसली , काही जणांनी आमचे ऐकले पण २-३ जिप्सी वाले मागेच थांबले. आता ती वाघीण हळू हळू रस्त्याकडे यायला लागली त्याच बरोबर आमचे श्वास जोरात चालू लागले आणि जिकडे अंदाज व्यक्त केला तिकडेच ती बरोबर बाहेर आली आमच्या कडे बघितले आणि थेट रस्त्यावर चालू लागली. ह्याला म्हणतात हेड ऑन चालणे.

माझ्या साठी हे ड्रीम होतं, ती पुढे यायला लागली कि आम्हीं पटापट गाड्या पुढे घायचो म्हणजे अंतर पण राहील. १५ मिनिट्स चालत होती आणि तेवढ्यात एका जिप्सी वाल्याने इतक्या जवळ जिप्सी नेली कि ती परत आत निघून गेली. सगळे जण त्या माणसावर खूप भडकले. आम्ही पुढे जाऊन थांबलो तिची वाट बघत. खूप दाट झाडी असल्याने नक्की कुठून बाहेर येईल ते कळत नव्हते आणि परत ती बाहेर आली एकदम आमच्या जिप्सी च्या समोर.

आम्ही पटकन जिप्सी मागे घेतली जेणेकरून तिला त्रास होणार नाही. हळू हळू ती परत रस्त्यावर आली, येता येता ती झाडाचा वास घेत होती आणि सेन्ट मार्क करत होती म्हणजे आपली हद्द ठरवत होती.

ह्या बरोबरच अजून एक ड्रीम होते माझे कि जे एक behavior असते वाघाचे त्याला म्हणतात Flehmen Response ते बघणे आणि जमल्यास फोटो मिळवणे . त्यांच्या टाळूवर असलेल्या Jacobson organ पर्यंत घेतलेला वास पोहोचवतात आणि आपल्याला जसे ५ सेन्स असतात पण वाघाला अजून एक सेन्स असतो ज्याच्यामुळे त्यांना कळते कि ह्या भागात अजून वेगळा वाघ / वाघिण आपल्या भागात आहे का, किंवा एखादी वाघिण माजावर आली आहे का. वगैरे. बऱ्याच फोटो मध्ये बघितले असल्यास हसल्या किंवा चिडल्या सारखा चेहरा केलेला असतो त्यालाच Flehmen Response behavior असे म्हणतात. तर हा Flehmen Response मला बघायला आणि फोटो मध्ये capture करायला मिळाला.

आता ती वाघीण जिचे नाव जुनाबाई असे आहे ती पुढे येत होती आणि एका ठिकाणी झाडाच्या मागून मस्त पैकी आमच्या कडे बघितले

आणि परत मुख्य रस्त्याला येऊन मिळाली आणि त्याच जिप्सी वाल्याने परत तिच्या जवळ जिप्सी नेल्याने ती आत मध्ये गेली आणि एका ठिकाणी झोपली. सगळे त्या ड्राइवर वर खूप चिडले होते आणि काही जण तर त्याला म्हणाले कि तुझी तक्रार करतो.. असो तर जुनाबाई आज जाऊन झोपली आता आम्हाला स्ट्रॅटेजि ठरवायची होती कि इतर वाघांच्या मागावर जायचे कि इकडेच थांबायचे. आमच्या अंदाजानुसार ती नक्कीच परत रस्त्यावर यायची होती कारण तिला तिची हद्द मार्क करायची होती आणि पुढे वेगळ्या ठिकाणी जायचे होते. आमच्या सगळ्यांचे एकमत झाले कि काहीही झाले तरी इकडून जायचे नाही. मग काय परत चितळे मदतीला धावले आणि बाकरवड्या पोटात सरकावल्या गेल्या. काही जिप्सी १० मिनिट्स थांबल्या आणि कंटाळून गेल्या . इकडे तिकडे फिरुन परत आम्ही जिकडे होतो तिकडे यायचे चौकशी करायचे आणि परत जायचे. अशा रीतीने अर्धा तास झाला, पाऊण तास झाला, १ तास झाला ड्राइवर म्हणाला आपल्याकडे अजून १ तास आहे त्यामुळे काळजी नाही. आणि पुढच्याच मिनिटाला आत मध्ये हालचाल जाणवली आणि ती उठली चालू लागली. परत नेहेमीप्रमाणे आम्ही एका ठिकाणी गाडी नेऊन उभी केली इतर गाड्यांना सूचना आणि विनंती केली आणि मॅडम रस्त्यावर आल्या. हा हा काय ती चाल, तो चेहरा, आणि जेंव्हा कॅमेऱ्यातून आपण बघतो तेंव्हा तिचे डोळे बरोब्बर आपल्यालवर रोखलेले असावे.. ह्या अनुभवाला जगात तोड नाही. पुढचा अर्धा तास ती मस्त पैकी रस्त्यावर चालत होती आणि वेग वेगळे पोझेस मध्ये आम्ही फोटो विडिओ काढत होतो.

तो क्षण संपूच नये असे वाटत असतांना एका ठिकाणी तिने रस्ता क्रॉस केला आणि आत निघून गेली.

आम्ही अक्षरशः स्वप्नवत थिजलो होतो. तेवढ्यात ड्राइवर म्हणाला सर १० मिनिट्स राहिले आहे फक्त आपल्याला तातडीने निघावे लागेल. त्याला म्हणालो मित्रा तू काय म्हणशील ते करतो आता तुझ्या आणि गाईड काकांमुळे सगळे स्वप्नवत पाहायला फोटो काढायला मिळाले. अशा रीतीने आमची शेवटची सफारी एकदम भारी झाल्याने रिसॉर्ट वर येऊन जोरदार स्वीट खाऊन आम्ही रात्री १० च्या सुमारास निघालो. जातांना

वाटेत चिमूर ला पान खाल्ले, गाडीत मस्त पैकी पंचम आणि किशोरची गाणी लावून नागपूर एअरपोर्ट वर आलो १२ वाजता. अजून ४ तासांनी विमान होते त्यामुळे तिकडेच खुर्ची वर पड्या टाकल्या आणि पहाटे ५ वाजता पुण्यात पोहोचून ६ ला घरी पोहोचलो. ह्या वेळेस आम्ही वाघ नुसता पाहिला नाही तर अनुभवला...

- योगेश पुराणिक

जुन २०२२

ह्या लेखातील सर्व फोटो योगेश पुराणिक ह्यांनी स्वतः काढलेली आहे आणि त्यांचा copyright आहे. कृपया करून कोणीही हे फोटो वापरण्या आधी योगेश पुराणिक ह्यांची परवानगी घ्यावी हि विनंती



धन्यवाद!

गजरा २०२५ साठी योगदान दिलेल्या सर्व सदस्यांचे कनेटिकट महाराष्ट्र मंडळ शतशः आभारी आहे. आपल्या प्रोत्साहानमुळे आम्ही असेच उपक्रम आपल्यापर्यंत घेऊन येऊ शकतो.

आपला अभिप्राय आम्हाला नक्की कळविणे - ctmmkarya@ctmm.org

-गजरा टीम